follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd. No. 72105/99 ※ वर्ष २५ ※ अंक २२६ ※ सातारा ※ बुधवार, दि. २४ एप्रिल २०२४ ※ पाने ६ (सुप्रभात) ※ किंमत ५/- रूपये

## थोडक्यात

### वाहनावर विनापरवाना स्पीकर लावल्याप्रकरणी एकावर कारवाई

**सातारा :** पोलीस परवाना न घेता पिकअप (एमएच ११ डीझेड ८८३८) या वाहनावर विनापरवाना स्पिकर लावल्याप्रकरणी एकावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, ही कारवाई दि. २१ एप्रिल रोजी दुपारी करण्यात आली आहे. भोंदवडे ते आंबवडे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर स्पिकर वाजवत पिकअप वाहन चालले होते. याप्रकरणी कपिल विजय मनवे (वय २४, रा. चिकणेवाडी, पो. आंबवडे बुद्रुक, ता. सातारा) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

### अवैध दारू प्रकरणी दोघांवर कारवाई

सातारा : अवैधरित्या दारु वाहतूक तसेच विक्री प्रकरणी पोलिसांनी दोघांवर कारवाई केली आहे.

पोवई नाका येथे अभयसिंह राजेंद्र घोरपडे (वय ३३, रा. भाडळे, ता. जावळी) याच्याकडे दि. २१ एप्रिल रोजी दुपारी अवैध दारु आढळून आली. त्याच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी त्याच्याकडून ३३६० रुपये किंमतीची दारु जप्त केली.

दरम्यान, मालगाव, ता. सातारा येथे नारायण शिवाजी गोळे (वय ५०, रा. मालगाव) हा अवैध दारु विक्री करताना आढळून आला. दि. २१ एप्रिल रोजी ही कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी त्याच्याकडून ८४० रुपये किंमतीची दारु जप्त केली.

### अपघातात जखमी केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** अपघातात जखमी केल्याप्रकरणी एका दुचाकी चालकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, येथील शिवराज फाटा येथील कणसे ढाब्यासमोर दुचाकीचा अपघात होवून दुचाकी दुभाजकावरुन खाली येवून एकाला धडक बसली. याप्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात महेश संजय जाधव (वय ५०, रा. संभाजीनगर, ता. सातारा) यांनी प्रवीण मंगेश जाधव (वय २५, रा. नागराळे, ता. पलूस, जि. सांगली) याच्या विरुध्द तक्रार दिली आहे.

ही घटना दि. १६ एप्रिल रोजी रात्री घडली आहे.

# मुळशीच्या मुठा गावात थरार

## गुंड नवनाथ वाडकरकडून पोलिसांवर गोळीबार

**पुणे : दरोड्याच्या प्रयत्नाच्या गुन्हयात फरार असलेल्या गुन्हेगाराचा पाठलाग करताना गुन्हेगाराने पोलीस पथकावर पिस्तूलातून गोळी झाडल्याने प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनी गुन्हेगारावर तीन गोळ्या झाडल्या. यानंतर त्याच्या दुचाकीला गाडी आडवी घालून त्याला साथीदारासह जेरबंद केले. मुळशी तालुक्यातील मुठा गावजवळ मंगळवारी दुपारी ही थरारक घटना घडली.**



नवनाथ निलेश वाडकर(वय १८ रा.जनता वसाहत, पर्वती) आणि केतन साळुंखे अशी अटक करण्यात आलेल्या गुन्हेगाराची नावे आहेत. केतन साळुंखे हा स्वारगेट पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या पत्रकारावरील हल्यातील आरोपी आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, नवनाथ वाडकर सराईत गुन्हेगार आहे. तो सिंहगड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याची खबर पोलिसांनी मिळाली होती. तेव्हा पोलिसांना हुलकावणी देत नवनाथने पळ काढला होता. याप्रकरणी सिंहगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. तेव्हापासून खंडणी विरोधी पथक त्याच्या मागावर होते. तो मुठा परिसरात पिस्तूल घेऊन आला असल्याची खबर खंडणी विरोधी पथकाला मिळाली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रताप मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीकांत चव्हाण यांचे पथक दोन मोटारींतून त्याच्या मागावर गेले. एनडीए रस्ता येथे तो दुचाकीवरुन साथीदारासह जाताना दिसला. पोलिसांनी त्याचा पाठलाग सुरु केल्यावर त्याने पोलिसांवर पिस्तूलातून गोळी झाडली. मात्र, सुदैवाने ती कोणाला लागली नाही. प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी त्याच्यावर तीन गोळ्या झाडल्या. यानंतर गाडी त्याच्या दुचाकीला आडवी घालून दोघांनाही ताब्यात घेतले.

### वाडकर टोळीची दहशत

**पर्वतीमध्ये निलेश वाडकर आणि चॉकलेट सुन्या अशा दोन टोळ्या आहेत. वर्चस्ववादातून दोन्ही टोळ्यांमध्ये अनेकदा खटके उडाले आहेत. चॉकलेट सुन्याच्या टोळीने २०१८ मध्ये निलेश वाडकर याचा पर्वती पायथा येथे खून केला. त्यामध्ये चॉकलेट सुन्यासह २२ जणांना अटक करण्यात आली. चॉकलेट सुन्या आणि साथीदारांविरुद्ध मोका कारवाई करण्यात आली. निलेश वाडकरचा मुलगा नवनाथ हा अल्पवयीन होता. वडिलांच्या खुनाचा बदला घेण्याची शपथ त्याने घेतली. वाडकर टोळीने चॉकलेट सुन्याच्या भावाचा खून केला. नवनाथने अल्पवयीन असतानाच दोन जणांच्या खुनाचा प्रयत्न केला. नवनाथवर अल्पवयीन असताना आठ गुन्हे दाखल झाले आहेत.**

## संविधान बदलणार नाही - अमित शाह



**अकोला :** भाजप पुन्हा सत्तेत आल्यास संविधान बदलेल व आरक्षण रद्द करेल, अशी अफवा काँग्रेसकडून सातत्याने पसरवली जाते. मात्र, संविधान कोणीही बदलू शकत नाही. भाजप असेपर्यंत एससी, एसटी आणि ओबीसींचे आरक्षण रद्द होणार नाही, अशा शब्दात केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले. भाजपने १० वर्षांत बहुमताचा वापर दहशतवाद, कलम ३७०, तिहेरी तलाक, आदी हटविण्यासाठी केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अकोला मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार अनुप धोत्रे यांच्या प्रचारार्थ अकोला क्रिकेट क्लब मैदानावर आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे, खासदार भावना गवळी, प्रदेश सरचिटणीस रणधीर सावरकर, डॉ. उपेंद्र कोठीकर आदींसह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. अमित शहा यांनी आपल्या भाषणात काँग्रेससह शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्यावर टीकास्त्र सोडले. 'इंडिया' आघाडीचा राम मंदिराला विरोध होता. काँग्रेसने ७० वर्ष हा प्रश्न रेंगाळत ठेवला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १० वर्षांत हा प्रश्न मार्गी लावून भव्य राम मंदिर उभारले. भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आणली. आता नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर भारताची अर्थव्यवस्था येईल, असा विश्वास शहा यांनी व्यक्त केला.

## केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत ७ मे पर्यंत वाढ

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टाने अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत ७ मे पर्यंत वाढ केली आहे. याआधी केजरीवाल यांची कोठडी १ एप्रिल ते १५ एप्रिल, त्यानंतर २३ एप्रिलपर्यंत वाढवण्यात आली होती. न्यायालयाच्या या आदेशानंतर केजरीवाल आता लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील मतदानादरम्यानही तुरुंगातच राहणार आहेत.



मद्य धोरण प्रकरणी ईडीने २१ मार्च रोजी केजरीवाल यांना अटक केली होती. २२ मार्च रोजी ते राऊस एव्हेन्यू कोर्टात हजर झाला, तेथून त्यांना २८ मार्चपर्यंत ईडी रिमांडवर पाठवण्यात आले.

येथे २२ एप्रिल रोजी केजरीवाल यांच्या शुगर लेव्हलमध्ये वाढ होत असताना इन्सुलिनची मागणी करणाऱ्या याचिकेवर न्यायालयाने एम्सच्या डॉक्टरांचे एक मंडळ तयार करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर मंगळवारी तिहार प्रशासनाने सांगितले की सोमवारी संध्याकाळी त्यांना इन्सुलिन देण्यात आले.

## चेन स्नॅचिंगप्रकरणी दोन अज्ञातांवर गुन्हा

**राजदंड / सातारा**

चेन स्नॅचिंग प्रकरणी दोन अज्ञातांविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, येथील कर्मवीरनगर बस स्टॉपपासून घरी जात असताना दुचाकीवरुन आलेल्या दोघा अज्ञातांनी महिलेच्या गळ्यातील दीड तोळे वजनाचे ७५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र लंपास केले. ही घटना दि. १९ एप्रिल रोजी घडली.

या प्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात अश्विनी सुभाष काळभोर (वय ३५, रा. कर्मवीरनगर, सातारा) यांनी तक्रार दिली आहे.

## भागिदारीतील जमिनीच्या वादातून मित्रानेच केला मित्राचा खून

### हडपसर महंमदवाडीतील घटना; आरोपीस २४ तासात कोंढवा पोलिसांनी केले गजाआड

**हडपसर : प्रतिनिधी**

भागिदारीत खरेदी केलेली जमीन नावावर करुन देण्यास विरोध केल्याने मित्रानेच मित्राचा निर्घृण खून केल्याची घटना कोंढवा पोलीस स्टेशन हद्दीत महंमदवाडीत घडली.

दि.१७/०४/२०२४ रोजी रहेजा स्टरलिंग फेज ६ क्लाऊड ९ सोसायटी मधील चालु बाधंकाम सोसायटीच्या तिसऱ्या मजल्यावरील प्रेशर डकमध्ये पंकजकुमार मोती कश्यप, वय ३५ वर्षे, रा. कृष्णानगर, ग.न.०२, महंमदवाडी पुणे हा सुपरवायझर काम करणारा इसम पडुन मयत झाला असल्याची माहिती प्राप्त झाली होती. परंतु घटनास्थळवर पोलिसांनी भेट दिली असता सदर इसम हा पडून मयत झाला नसून त्याचा पाचव्या मजल्यावरील चालू बाधंकामाच्या फ्लॅटमध्ये पूर्ण शरीरावर धारदार हत्याराने ठिकठिकाणी भोकसून खून करून मृतदेह प्रेशर डकमध्ये टाकून दिल्याचे निदर्शनास आले.

या प्रकरणी कोंढवा पोलीस स्टेशन येथे अज्ञात इसमाविरूध्द खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

कोंढवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी घटनास्थळावर भेट देवून व घटनेचे गांभीर्य पहाता आरोपी यांचा शोध घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याप्रमाणे सपोनि संतोष सोनवणे, पोनि गुन्हे मानसिग पाटील यांनी दिलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे सपोनि लेखाजी शिंदे, पोउपनि बालाजी डिंगोळे व त्यांचे तपास पथक अज्ञात आरोपी यांचा शोध घेत होते. त्यावेळी खुनाच्या रात्री संशयितांपैकी एक राज उर्फ सुरेश मनीराम आर्या हा आणखी काही मजुरांसमवेत उत्तर प्रदेश येथे पळुन गेल्याचे समजले. लागलीच एक पथक उत्तरप्रदेश येथे आरोपीचा माग घेण्यासाठी रवाना करण्यात आले.

मजुरांकडे चौकशी दरम्यान व नातेवाईकांचा शोध घेवून मयत इसम हा आरोपी राज उर्फ सुरेश मनीराम आर्या, वय ३४ वर्षे, सध्या रा. महंमदवाडी पुणे मुळ रा. उत्तरप्रदेश याच्या सोबत पुर्वी काम करित असताना दोघांनी मिळून मुळगावी उत्तरप्रदेश येथे एकत्रित जमीन खरेदी केली असल्याचे व ती जमीन मयत पंकजकुमार मोती कश्यप याच्या नावावर असुन ती तो सुरेश आर्या यास नावावर करुन देण्यास विरोध करित असल्याने त्यांच्यामध्ये वाद झाले होते, अशी माहिती मिळाली.

त्यानंतर पोलिसांनी पुणे व उत्तर प्रदेश येथून दोघा संशयितांना ताब्यात घेतले. त्यापैकी राज उर्फ सुरेश मनीराम आर्या, वय ३४ वर्षे, सध्या रा. महंमदवाडी पुणे मुळ रा. उत्तरप्रदेश याने त्याचा साथीदार नातेवाईक (दाजी) भोलानाथ राजाराम आर्या यांच्या मदतीने खुन केल्याची कबुली दिली.

## सांगलीत तिरंगी लढत; २० उमेदवार आखाड्यात

**राजदंड / सांगली**

राज्याचे लक्ष लागलेल्या सांगली लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचे विशाल पाटील यांचा बंडाचा निर्णय अखेर कायम राहिला. अर्ज माघारीसाठी प्रदेशच्या नेत्यांकडून अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्न करण्यात आले, मात्र त्यांनी अपक्ष लढण्यावर ठाम राहिले. विशाल यांच्या बंडामुळे भाजपचे खासदार संजयकाका पाटील, महाविकास आघाडीकडून शिवसेनेचे चंद्रहार पाटील यांच्यात सांगलीची तिरंगी लढत होत आहे. निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सोमवारी पाच उमेदवारांनी माघार घेतली. निवडणुकीच्या रिंगणात तब्बल २० उमेदवार राहिले असून त्यांना निवडणूक चिन्ह वाटप करण्यात आल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सांगितले. स्वाभिमानी पक्षाकडून महेश खराडे यांच्यासह अन्य पक्ष व अपक्षांचा समावेश आहे. दरम्यान मंगळवारपासून (दि.२३) प्रचाराची रणधुमाळी सुरु होणार आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी दाखल अर्ज व छाननीनंतर एकूण २५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. आज सोमवारी दुपारी तीन वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत होती. सोमवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी वीसपैकी उमेदवारांपैकी पाच जणांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. त्यामुळे आता उर्वरित २० उमेदवारांमध्ये थेट लढत होणार आहे. काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष विशाल पाटील यांच्या माघारीसाठी वरिष्ट पातळीवरुन शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न करण्यात आले. पाटील यांना विधानपरिषद अथवा राज्यसभा देण्याची ऑफर देत मनधरणीचा प्रयत्न केला. काँग्रेसचे वरिष्ठ नेत्यांकडून विशाल यांच्याशी संपर्क करून अर्ज मागे घेण्याची विनंती केली. परंतु उमेदवारी मागे न घेण्यासाठी विशाल यांच्यावर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा दबाव राहिला. त्यामुळे पाटील यांचा अपक्ष अर्ज राहिला. त्यांची उमेदवारी राहिल्याने महाविकास आघाडीत फूट पडल्याने स्पष्ट झाले.

**लोकसभा रिंगणातील प्रमुख उमेदवार**

१. संजय रामचंद्र पाटील (भाजप)
२. चंद्रहार सुभाष पाटील (शिवसेना)
३. विशाल प्रकाशराव पाटील (अपक्ष)
४. सिकंदर पटवेगार (बहुजन समाज पार्टी)
५. आनंद शंकर नलगे (बळीराजा पार्टी)
६. महेश यशवंत खराडे (स्वाभिमानी पक्ष)
७. पांडुरंग रावसाहेब भोसले (भारतीय जवान पार्टी)
८. सतिश कृष्णा कदम (हिंदुस्थान जनता पार्टी)

भाजप, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षांना त्यांच्या निवडणूक चिन्ह तर इतरांना विविध निवडणूक चिन्हे दिली गेली आहेत. भाजपचे संजयकाका पाटील यांना कमळ, शिवसेनेचे चंद्रहार पाटील यांना मशाल आणि काँग्रेसचे बंडखोर विशाल पाटील याांना लिफाफा आणि स्वाभिमानी शेतकरी पक्षाचे विशाल पाटील यांना शिट्टी हे चिन्ह मिळाले.

## भव्य रॅली, पदयात्रेसह जोरदार शक्तीप्रदर्शन करीत संजोग वाघेरेंचा उमेदवारी अर्ज दाखल

- आदित्य ठाकरे, माणिकराव ठाकरे, अमोल कोल्हे, रोहित पवारांची उपस्थिती
- महाविकास आघाडीच्या असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी



**पिंपरी/प्रतिनिधी**

महापुरुषांना अभिवादन करून आणि आराध्य दैवतांच्या मंदिरात आशिर्वाद घेऊन, तसेच भव्य दुचाकी रॅली, पदयात्रेने जोरदार शक्तीप्रदर्शन करीत मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी आज, मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल केला.

आकुर्डी येथील मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांच्याकडे संजोग वाघेरे पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करताना त्यांच्यासोबत आमदार रोहित पवार, काँग्रेसचे आमदार संजय जगताप, जिल्हाप्रमुख माजी आमदार गौतम चाबुकस्वार, शेतकरी कामगार पक्षाचे नेते माजी आमदार बाळाराम पाटील, काँग्रेस शहराध्यक्ष कैलास कदम, जे. एम. म्हात्रे, माऊली दाभाडे, जगन्नाथ शेवाळे आदी उपस्थित होते. अर्ज दाखल करण्यापूर्वी पिंपरीगाव येथून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन व ग्रामदेवत भैरवनाथ मंदिरात आशिर्वाद घेऊन दुचाकी रॅलीस सुरुवात झाली. पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांचे स्मारक, चिंचवडगावात क्रांतीवीर चापेकरांच्या स्मारकास अभिवादन, महासाधू मोरया गोसावी मंदिरात आशिर्वाद घेऊन रॅली आकुर्डीतील खंडोबा माळ येथे पोहोचली. खंडोबा मंदिरात आशिर्वाद घेऊन परिवर्तन रथातून संजोग वाघेरेंसह महाविकास आघाडीचे नेते अभिवादन करत पदयात्रेची सुरुवात झाली. संजोग वाघेरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आकुर्डी प्राधिकरणातील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयापर्यंत पदयात्रा पोहोचली.

या पदयात्रेत युवासेनेचे प्रमुख तथा माजी पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे, काँग्रेसचे नेते माणिकराव ठाकरे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार, शेतकरी कामगार पक्षाचे नेते तथा माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) उपनेते तथा आमदार सचिन अहिर, जिल्हाप्रमुख ॲड. गौतम चाबुकस्वार, शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### विजयाचा गुलाल उधळणार : संजोग वाघेरे

**उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, ''देशाची लोकसभा निवडणूक सर्वार्थाने महत्त्वपूर्ण आहे. जनहितापेक्षा स्वहिताला प्राधान्य देणा-या, देशातील जनतेची फसवणूक करणा-या प्रवृत्तीविरुध्द ही निवडणूक आहे. महागाई, बेरोजगारीविरुध्द आणि दडपशाहीच्या राजकारणाविरोधात निर्णय घेण्यासाठी मतदार तयार आहेत. पुन्हा एकदा मावळ लोकसभा मतदारसंघात गद्दारी गाडली जाईल आणि निष्ठावंत शिवसैनिकांचा विजय होईल. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष मावळचा गड कायम राखणार आहे. महाविकास आघाडीचा प्रत्येक कार्यकर्ता विजयाला गुलाल उधळणार आहे''.**

## भाजपच्या दहा वर्षात थापा व हुकूमशाही; काँग्रेसला बळकटी येणार - आ. पृथ्वीराज चव्हाण

**राजदंड / मसूर**

सत्तेची लालसा भाजपला लागली आहे. भाजपने दहा वर्षात दिलेली आश्वासने न पूर्ण करता शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार असल्याच्या थापाच मारल्या. त्यांची हुकुमशाही सुरू असल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी येथे काँग्रेसच्या मेळाव्यात बोलताना केला. आता काँग्रेसला बळकटी आल्याशिवाय राहणार नाही. काँग्रेसचा आत्ताचा जाहीरनामा बघा. ही कामे करण्याची धमक कांग्रेसमध्येच आहे असेही त्यांनी स्पष्ट केले.

माजी मुख्यमंत्री चव्हाण म्हणाले महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या भाजप काळात अनुभवल्या. शेतकऱ्यांची प्रश्न सुटले नाहीत. विकासाचा वेग मंदावला. भाजपच्या दहा वर्षाच्या काळातील तुलना केली असता २० कोटी रोजगार उपलब्ध व्हायला हवे होते. भाजपने आश्वासने पूर्ण केली नाहीत. विश्वासाने निवडून दिलेले आमदार गद्दार निघाले. ५० खोके दिले ते जनतेकडून वसूल करणार आहेत. असे स्पष्ट करून चव्हाण म्हणाले संविधान बचाव मोहीम सुरू आहे. काँग्रेसचा आत्ताचा निवडणूक जाहीरनामा बघा. गरिबांचे व महिलांसाठी हिताची निर्णय घेतले आहेत. ती कामे करण्याची धमक काँग्रेसमध्ये आहे. काँग्रेस पक्षाला बळकटी आल्याशिवाय राहणार नाही. लोकसभेची निवडणूक चुरशीची ठरणार आहे. महाविकास आघाडीला मोठे यश मिळणार आहे.



माजी जिल्हा परिषद सदस्य सुदाम दीक्षित यांनी स्वागत केले. निवास थोरात यांनी प्रास्ताविक केले. विजय माने यांनी सूत्रसंचालन केले. पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते कराड उत्तर काँग्रेस कमिटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांना पदनियुक्त पत्र देण्यात आले. सेल कार्यकारिणीच्या नियुक्ती करण्यात आल्या.

या मेळाव्यास सातारा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सुरेश जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष शिवराज मोरे, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा अल्पना जाधव, प्रदेश काँग्रेस कमिटीचे अजितराव पाटील चिखलीकर, महानंदा दूध डेअरीचे माजी संचालक वसंतराव जगदाळे, काँग्रेसचे सातारा जिल्हा सरचिटणीस नंदकुमार जगदाळे, अविनाश नलवडे, अमित जाधव, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष अमरजीत कांबळे, राहुल चव्हाण उपस्थित होते.

> **"आज कराड उत्तरमध्ये काँग्रेस पक्ष संघटन वाढीसाठी प्रयत्न करणारे काँग्रेसचे तालुका अध्यक्ष निवास थोरात यांचे काम कौतुकास्पद आहे. त्यांनी आजचा पद नियुक्तीचा कार्यक्रम घेऊन उत्तर मधील काँग्रेस पुन्हा एकदा जागरूक केली आहे. काँग्रेस प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या पाठीशी कायम राहील.**
> **- आ. पृथ्वीराज चव्हाण**

स्थित्यंतर

# मध्यपूर्व संघर्षाची भारताला चिंता!



राही भिडे
९८६७५२१०४९

इराण आणि इस्त्रायलमध्ये युद्ध झाल्यास त्याचे भारतावर दूरगामी आर्थिक परिणाम होऊ शकतात. भारताचे इराणसोबतचे वाढते आर्थिक सहकार्य अडचणीत येण्याची शक्यता आहे. भारत इराणचे चाबहार बंदर विकसित करत असून यासारखे अनेक प्रकल्प अडचणीत येण्याची शक्यता आहे. इस्त्रायलशीही भारताचे संबंध आहेत. या दोन देशांत तीस हजार भारतीय राहतात. त्यांची सुरक्षितता भारतासमोरचे आव्हान आहे. इराणने इस्त्रायलवर केलेल्या क्षेपणास्त्र व ड्रोन हल्ल्यामुळे दोन्ही देशातील संबंध ताणले आहेत. मध्यपूर्व क्षेत्रात निर्माण झालेल्या या युद्धजन्य परिस्थितीवर भारताने चिंता व्यक्त केली आहे. भारताच्या चिंतेचे कारण म्हणजे या देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांची सुरक्षा तसेच भूराजकीय आणि आर्थिक हितसंबंध. युद्धजन्य परिस्थितीमुळे भारताचे आर्थिक हित धोक्यात आले आहे. या दोन्ही देशात सुमारे ३० हजार भारतीय राहतात. त्यांची सुरक्षा सुनिश्चित करणे ही सरकारची प्राथमिकता आहे. इराण आणि इस्त्रायल या दोन्ही देशांच्या अवतीभोवती सौदी अरेबिया, इराक, ओमान, येमेन, सीरिया, जॉर्डन, इजिप्त आदी सुन्नीबहुल देश आहेत. १९४८ मधील निर्मितीपासूनच इस्त्रायल आपले ज्युईश अस्तित्व टिकवण्यासाठी झुंजत आहे, तर दुसरीकडे इराणदेखील आपली पर्शियन शियाबहुल देश म्हणून ओळख टिकवून ठेवण्याच्या प्रयत्नात आहे. याआधारे इस्त्रायल आणि इराणमध्ये मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले होते. यामागचे कारण म्हणजे या दोन्ही देशांना अरब देशांचे वर्चस्व मान्य नव्हते. तुर्की नंतर इस्त्रायलला मान्यता देणारा इराण हाच दुसरा देश होता. मध्य पूर्वेतील संघर्षाची भारताला चिंता ! १९७९ मध्ये इराणमध्ये इस्लामिक क्रांती होऊन आयातुल्ला अली खामेनी इराणच्या सत्तापदी बसल्यावर हे चित्र बदलले. यानंतर दोन्ही देशांमधील संबंध बिघडत गेले. मागच्या तीन दशकांपासून इराण आणि इस्त्रायलमध्ये वर्चस्वासाठी छुपी लढाई सुरूआहे. अशाच छुप्या लढाईचा भाग म्हणून इराणकडून सीरियात तळ ठोकून असलेल्या लेबनॉनच्या हिजबुल्ला या दहशतवादी संघटनेला अर्थ आणि शस्त्र पुरवठा केला जातो. हा रसद पुरवठा तोडून सीरियात इराणचे प्राबल्य कमी करण्यासाठी इस्त्रायलदेखील प्रयत्नशील आहे. त्यातच सीरियाच्या दमास्कस शहरातील इराणच्या दूतावासावर एक एप्रिल रोजी एक हवाई हल्ला झाला होता. या हवाई हल्ल्यात दोन वरिष्ठ कमांडरसह एकूण १३ लष्करी अधिकाऱ्याचा मृत्यू झाला होता. यामध्ये इराणच्या कुड्स फोर्सचे कमांडर ब्रिगेडियर जनरल मोहम्मद रझा झा हेद यांचाही समावेश होता. हिजबुल्ला संघटनेला नियंत्रित करणाऱ्यांमध्ये रझा झाहेद यांचे नाव घेतले जाते. त्यामुळे या हल्ल्यामागे इस्त्रायलचा हात असल्याचा दावा करत इराणने इस्त्रायलवर प्रतिहल्ला करण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर शनिवारी १३ एप्रिलला इस्त्रायलशी संबंधित एक मालवाहू व्यापारी जहाज होरमुझ सामुद्रधुनीतून जात असताना इराणने ताब्यात घेतले. या जहाजावर असलेल्या एकूण २५ खलाशांपैकी १७ भारतीय आहेत. त्यातील काहींची सुटका करण्यात यश आले. इराणने जवळपास ३०० ड्रोन्स मिसाईल इस्त्रायलवर सोडले होते; परंतु इस्त्रायलने इराणच्या ९९ टक्के मिसाईल्स हवेतच नष्ट केल्या. त्यामुळे इस्त्रायलला दणका द्यायची इराणची योजना फसली. इराणने या योजनेला 'ऑपरेशन टू प्रॉमिस' असे नाव दिले आहे; परंतु हल्ला फसल्याने इराणचे मनसुबे धुळीला मिळाले. म्हणून इराण अधिकच चवताळला आहे. दोन्ही देशांनी आपापसांतील वाद चर्चेतून आणि मुत्सद्देगिरीने सोडवण्याचे आवाहन अनेक देशांनी इराण-इस्त्रायलला केले आहे. भारताचे इस्त्रायल आणि इराण या दोन्ही देशांशी सखोल राजनैतिक संबंध आहेत. हे संबंध आजचे नाही तर अनेक दशकांमध्ये भारतीय मुत्सद्यांनी केलेली मेहनत आणि राजकीय चातुर्याने मजबूत झाले आहेत. त्यामुळे इस्त्रायल आणि इराणमध्ये तणाव वाढल्यास कुणा एकाची बाजू घेणे भारतासाठी आव्हानात्मक बाब असेल. एका अर्थाने भारतासाठी दोरीवरून चालण्या सारखी अवस्था असेल; पण असा दोरीवरचा प्रवास करण्याची अर्थात तटस्थ राहण्याची भारताची पहिली वेळ नाही. इस्त्रायल हा भारताचा जुना मित्र आहे. दोन्ही देशांमध्ये विशेषतः संरक्षण आणि सुरक्षा क्षेत्रात महत्त्वाचे धोरणात्मक संबंध आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या काळात भारत आणि इस्त्रायलमधील संबंध केवळ मजबूतच झाले नाहीत, तर ते बोलकेही झाले आहेत. गेल्या वर्षी सात ऑक्टोबरला इस्त्रायलवर हमासच्या हल्ल्यानंतर दोघांमध्ये युद्ध सुरू झाले होते, तेव्हा सुरुवातीच्या काही तासातच भारताने इस्त्रायलला पाठिंबा दर्शवला होता; परंतु भारताचे इराणशीही मजबूत राजनैतिक संबंध आहेत. इराण हा भारताला कच्च्या तेलाचा फार पूर्वीपासून प्रमुख पुरवठादार आहे; मात्र अमेरिकेच्या निर्बंधांमुळे यावर परिणाम झाला. हे निर्बंध दोन्ही देशांसाठी घाटे का सौदा ठरले. इस्त्रायलमध्ये १८ हजार, तर इराणमध्ये ५ ते १० हजार भारतीय राहतात. या दोन्ही देशांत कोणत्याही प्रकारची अस्वस्थता निर्माण झाल्यास इथे राहणाऱ्या अनिवासी भारतीयांची सुरक्षा धोक्यात येऊ शकते. अशा परिस्थितीत केंद्र सरकारला तिथे राहणाऱ्या भारतीय नागरिकांना सुखरूपरित्या परत आणावे लागेल. हे प्रकरण केवळ या दोन देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांपुरतेच मर्यादित नाही. आखाती देशांमध्ये सुमारे ९० लाख भारतीय राहतात. यातील बहुतांश लोक कामाच्या शोधात तेथे गेले आहेत. इराण आणि इस्त्रायलमध्ये तणाव वाढल्यास या ९० लाख स्थलांतरितांना याचा फटका बसेल. कच्च्या तेलाच्या सहाय्याने केवळ वाहने चालत नाहीत, तर संपूर्ण अर्थव्यवस्था चालते. भारत आपल्या गरजेच्या ८७.७ टक्के कच्चे तेल आयात करतो. हे प्रमाण गेल्या वर्षी ८७ टक्के इतकेच होते. म्हणजेच भारताच्या कच्च्या तेलाच्या मागणीत वर्षभरात ०.७ टक्के वाढ झालीय. एकट्या जानेवारी २०२४ मध्ये भारताने २१. ४ दशलक्ष टन कच्चे तेल आयात केले होते. मागील २० महिन्यांतील ही सर्वोच्च आयात होती. कच्च्या तेलाच्या किमतीचा थेट संबंध भारताच्या चलनवाढीशी आहे. कच्च्या तेलाच्या अर्थात पेट्रोल-डिझेल, नैसर्गिक वायूच्या किमती वाढल्यास भाजीपाला, दूध, धान्यासह प्रत्येक वस्तू महाग होते. या महागाईला आटोक्यात आणणे कोणत्याही देशाच्या सरकारसाठी सोपी गोष्ट नाही. पाकिस्तान भारताला मध्य आशियातून निर्यात करू देत नाही. त्यामुळे इराणचे चाबहार बंदर हे अफगाणिस्तानसह इतर देशांसाठी आयात-निर्यातीचे महत्त्वाचे केंद्र आहे. युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाल्यास भारताच्या निर्यातीवरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे मध्य पूर्व आशियातील अस्वस्थता भारतासह कुणालाही परवडणारी नसेल. इराण आणि इस्त्रायलमध्ये युद्ध झाल्यास त्याचा भारताच्या आर्थिक संबंधांवर परिणाम होऊ शकतो. भारताची इराणसोबतची वाढती आर्थिक भागीदारी, विशेषतः चाबहार बंदर विकासासारखे प्रकल्प रखडण्याची शक्यता आहे. चाबहार बंदर हे पाकिस्तानमधील चीन विकसित करत असलेल्या ग्वादर बंदराजवळ आहे. हे बंदर या प्रदेशातील व्यापारी मार्ग आणि कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत करण्याच्या भारताच्या प्रयत्नांचा एक भाग आहे. दोन्ही देशांमधील लष्करी कारवाईमुळे या प्रयत्नांना धोका निर्माण होऊ शकतो. याशिवाय 'इंटरनॅशनल नॉर्थ-साउथ ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर'मध्येही अडथळा येऊ शकतो.

## माढा लोकसभा मतदारसंघातील उत्तर कोरेगावात मतदारांमध्ये नाराजीचा सूर

### परीसरातील समस्यांकडे लोकप्रतिनीधींचे दुर्लक्ष असल्याच्या मतदारांच्या प्रतिक्रिया



**- शुभम गुरव**
**आसनगाव**

राजकीयदृष्ट्या संवेदनशील मानल्या जाणार्या माढा लोकसभा मतदारसंघातील कोरेगाव तालुक्याच्या उत्तर कोरेगावात सध्या मतदारांनमध्ये चांगलाच नाराजीचा सूर पहावयास मिळत आहे . उत्तर कोरेगावातील अनेक समस्यांकडे लोकप्रतिनिधी आणि राजकीय पुढार्यांचे दुर्लक्ष असल्याच्या भावना मतदार व्यक्त करीत आहे. अद्याप परीसरातील न सुटलेल्या समस्यांचा नेमका फटका कोणाला बसणार हे आगामी निवडणुकीतून स्पष्ट होईल.गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत या भागाने भाजपला चांगली साथ दिली होती.उत्तर कोरेगावात सध्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे.शासकीय टँकर देखील अपुरे पडत असल्याची कुजबूज नागरीकांनमध्ये आहे .तसेच शेती हा या परीसराचा उदरनिर्वाहाचा कणा असल्याने दुष्काळामुळे शेतीचेही अर्थकारण कोलमडत आहे परीनामी येथील शेतकरी उद्धस्त होत आहेत.लोकप्रतिनीधी दर निवडणुकीला आश्वासनाचा महापूर मतदारांनपुढे ओघतात आणि या आश्वासनांना हरताळ फासनाचे काम लोकप्रतिनिधी मार्फत केले जात असल्याच्याही प्रतिक्रिया मतदार व्यक्त करत आहेत.

आतापर्यंत उत्तर कोरेगावचा विकास काय? आणि किती झाला आज येथील तरूण वर्ग बेरोजगारीच्या गर्तेत अडकला आहे.पाण्याअभावी शेती पिकत नाही , तरूणांना रोजगार नाही, बेकारीमुळे लग्न जुळेना, गुन्हेगारी, व्यसनाधीनता वाढत आहे

अशीच पिढ्यानपिढ्या अवस्था आहे.रस्ते ,सभामंडप,मंदिराचा जीर्णोद्धार ही कामे करून मूळ समस्यांकडे लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करीत असल्याची कुजबूज सर्वसामान्य मतदार करीत आहेत.यामुळे आगामी काळात उत्तर कोरेगावात राजकीय समीकरणे काय होणार आहेत हे पहाणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

**आशावादी तरूणांच्या पदरी मिळालेली निराशा संपणार तरी कधी?**

**उत्तर कोरेगाव परीसरातील तरूणांची नोकरीसाठी होणारी भटकंती मुंबई,पुणे,शिरवळ,लोणंद तसेच इतर ठिकाणी होणारी पायपीट थांबवणार कधी? असा सवाल तरुण मतदार करीत आहे.रोजीरोटीसाठी होणारे स्थलांतर कधीतरी थांबेल अशी आशा देखील आजचा तरूण वर्ग बाळगून आहे.**

## जोतिबाचा डोंगर तीन लाख भाविकांनी फुलला

**कोल्हापूर :** आकाशाच्या दिशेने झेपावणाऱ्या सासनकाठ्या पारंपारिक वाद्याचा गजर, चांगभलं हो चांगभलं देवा जोतिबा चांगभलं, जोतिबाच्या नावानं चांगभलं ,गुलालाची उधळण करत वाडी रत्नागिरी येथील श्री ज्योतिबाची चैत्र यात्रा मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरण पार पडली .यंदाच्या यात्रेत सुमारे तीन लाख भाविकांनी उपस्थित दर्शवली होती

काल यात्रेच्या पूर्वसंध्येला वाडी रत्नागिरी येथील जोतिबाचा डोंगर भक्तांच्या अलोट गर्दीने फुलून गेला होता दख्खनचा राजा श्री जोतिबा देवाच्या पौर्णिमा यात्रेचा मंगळवार हा मुख्य दिवस होता. सोमवार रात्रीपर्यंत भाविक दाखल झाले होते. चैत्र यात्रेचे मुख्य आकर्षण असणाऱ्या सासनकाठी मिरवणुकीसाठी मानाच्या सासन काठया जोतिबा डोंगरावर दाखल झाल्या होत्या . चांगभलंच्या गजराने अवघा जोतिबाचा डोंगर दुमदुमून गेला. डोंगर वाटा भाविकांच्या गर्दीने फुलून गेल्या . बैलगाडी, खाजगी वाहनातून पायी चालत भाविक जोतिबा डोंगरावर आले होते . जोतिबा मंदिरात पहाटे तीन पासून धार्मिक विधी सोहळ्यास प्रारंभ झाला. पाच वाजता शासकीय महाभिषेक पन्हाळा तहसिलदार यांचे हस्ते करण्यात आली. १० वाजता धुपारती सोहळा करून. जोतिबा दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी अमोल येडगे यांचे हस्ते मानाच्या पहिल्या सासनकाठीच्या पुजनाने मिरवणुकीस प्रारंभ झाला.



चैत्र यात्रेत गुलाल-खोबरे, बंदी नाणी यांची पालखीवर होणारी उधळण अनोखी असते. सासनकाठ्या चाळीस फूट उंचीच्या असतात. रंगीबेरंगी कपड्यांनी सजविलेल्या सासनकाठ्या आकर्षक व सुंदर दिसतात. काही काठ्यांना नोटांच्या माळा, फुलांच्या माळा असतात. हलगी, पिपाणी, तुतारी, सनईच्या तालावर काठ्या विशिष्ट पद्धतीने नाचविल्या जातात. भर उन्हात तरुण वर्ग, गुलालात चिंब होऊन नाचतो. सर्वांच्या मुखात जोतिबाच्या नावानं चांगभलचा अखंड गजर केला.

दुपारी १२ वाजता सासनकाठीच्या मिरवणुकीस प्रारंभ केला.त्यावेळेस देवस्थान कमिटीचे म्हालदार ,चोपदार तोफेच्या सलामीने मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.. या मिरवणुकीमध्ये क्रमवारे पहिला मान पाडळी (जि. सातारा) या सासनकाठीचा,त्यानंतर मौजे विहे (ता.पाटण), करवीर कोल्हापूरची हिंमत बहादूर चव्हाण, कोल्हापूर छत्रपती, कसबा डिग्रज (ता. मिरज), कसबा सांगाव (ता.कागल), किवळ (जि. सातारा), कवठेएकंद (जि. सांगली) यांच्या मानाच्य एकूण १०८ सासनकाठ्या सहभागी असतात. या मिरवणुकीमध्ये २० फुटांपासून ते ७० ते ८० फुटांच्या उंचच उंच सासनकाठ्या सहभागी असतात. हस्तनक्षत्रावर सांय ५ . ४५ वाजता श्री . जोतिबाचा पालखी सोहळा निघाला. यावेळी तोफेच्या सलामीने जोतिबा मंदिरातून यमाई मंदिराकडे पालखी मार्गस्थ झाली. सायंकाळी साडेसहा वाजता यमाई मंदिरात यमाईदेवी व जमदग्नी यांच्या विवाह सोहळ्याचा धार्मिक विधी पार पडला. श्री जोतिबा मंदिरात येऊन तोफेच्या सलामीने रात्री दहा वाजता पालखी सोहळ्याची सांगता झाली.

महाराष्ट्र, कर्नाटकसह अन्य राज्यांतील कोट्यावधी भाविकांचे कुलदैवत, श्रध्दस्थान असलेल्या श्री केदारनाथ (जोतिबा) देवाची चैत्र यात्रेच्या मुख्य दिवसातील धार्मिक विधी मंगळवार १९ एप्रिल २०२४ कामदा एकादशी पालखी सोहळा सुरू (एकुण पालखी १६) रोज रात्री ८:३० वाजता मंगळवार दि. २३ एप्रिल २०२४ चैत्र यात्रेचा मुख्य दिवस पहाटे ३ वा महाघंटा नाद, काकड, आरती , पाद्यपूजा, मुखमार्जन होईल. ५ ते ६ वा. श्रींचे मुख्य पुजारी व शासकीय महाअभिषेक पन्हाळा तहसीलदार व देवस्थान इनचार्ज व अन्य पुजारी यांचे उपस्थितीत संपन्न झाला..स.६ ते ८ श्रींची राजदरबारी बैठी अलंकार महापूजा बांधली जाणार आहे .सकाळी १०:३० ते दु. १२:०० वा पर्यत धुपारती. दुपारी १२ वा सासनकाठी मिरवणुकीस प्रारंभ जिल्हाधिकारी अमोल येडगे यांचे हस्ते मानाच्या काठीचे पुजन करून . ५. ४५ वाजता तोफेची सलामी होताच मंदिरातुन श्रीं च्या पालखीचे प्रस्थान श्री यमाई मंदिराकडे झाले. पालखीचा पहिला विसावा कमलाकर मिटके (राजाज्ञे) या ठिकाणी होईल .कारण या ठिकाणी सूर्यदेव तेथे श्री .नाथांच्या दर्शनास येतात. पालखीचा दुसरा विसावा पागीता येथे होईल .सुर्यास्त सायं. ०६:४५ नंतर यमाई मंदिरातील सदरेवर पालखी विराजमान होईल. या वेळी यमाई (रेणुका) आणि कट्यार रूपी जमदग्नी यांचा विवाह संपन्न झाला.

## काँग्रेस उमेदवाराचा पराभव नजरेपुढे दिसू लागल्याने सतेज पाटील सैरभैर

### चंदगडच्या मेळाव्यात सतेज पाटील यांच्यावर घणाघती टीका

**चंदगड :** खासदार संजय मंडलिक यांचा विजय निश्चित असल्यामुळे काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांचा तोल सुटला आहे. त्यांच्या तोंडातून गटारगंगा वाहू लागली आहे. त्यांना माहित असावे की, खासदार संजय मंडलिक स्वतःच्याच घरात झोपतात. कधी कुणा नटीच्या नादाला लागलेले नाहीत. म्हणून त्यांचा संसार टिकून आहे. अशी बोचरी टीका शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष राजेखान जमादार यांनी केली आहे.

चंदगड येथील महायुतीच्या मेळाव्यात जमादार बोलत होते.जिल्हा उपसंघटक डॉ नामदेव निट्टुरकर व उपतालुकाप्रमुख सौ. सुजाता कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले.

जमादार म्हणाले,काँग्रेस उमेदवार शाहू महाराज यांच्या प्रचार सभांत बोलताना आमदार सतेज पाटील यांनी प्रचाराची पातळी सोडली आहे. काँग्रेस उमेदवाराचा पराभव नजरेपुढे दिसू लागल्याने ते सैरभैर





झाले आहेत. त्यातूनच संजय मंडलिक यांच्यावर पातळी सोडून टीका करू लागले आहेत. आता त्यांच्या झोपण्यावरही टिका सुरू आहे. याकडे लक्ष वेधत राजेखान जमादार म्हणाले, आमचे खासदार स्वतः च्याच घरात झोपतात. कधी कुणा नटीच्या नादाला लागलेले नाहीत. म्हणून त्यांचा संसार टिकून राहिलेला आहे. अनेक निवडणुकात खासदार संजय मंडलिक यांचा पाठिंबा सतेज पाटील घेतला. त्यामुळे त्यांना विविध संस्थात यश मिळाले आहे. यशाचे सगळे श्रेय लाटण्यात सतेज पाटील माहीर आहेत. मंडलिकांचा पाठिंबा घेवून मिळालेल्या विजयाचा गुलाल आपल्या अंगावर टाकून घेण्यात त्यांचा कोणी हात धरू शकत नाही. अनेक निवडणूकातील विजयात संजय मंडलिक यांचा खारीचा वाटा आहे. एवढीही कृतज्ञता सतेज पाटील यांच्याकडे नाही.

**काँग्रेस हाय कमांडने कोल्हापूरची उमेदवारी सतेज पाटील यांनाच दिली होती. पण आपण जनतेतून निवडून येणार नाही हे पक्के माहित असलेल्या सतेज पाटलांनी उमेदवारीची माळ ७७ वर्षाच्या शाहू महाराजांच्या गळ्यात घालून महाराजांचा राजकीय बळी देण्याचे पातक केले आहे. अशी टीका राजेखान जमादार यांनी केली.**

जिल्हाध्यक्ष जमादार म्हणाले,

गृहराज्यमंत्री असताना २०१४ साली विधानसभेची निवडणूक झाली. या निवडणूकीत अमल महाडीक यांच्या सारख्या नवख्या उमेदवाराने त्यांना पराभव केला. त्यानंतर ते इतके कपटीकारस्थान, पाताळयंत्री , मायावी बोलणारे आणि विश्वास घातकी झाले आहेत की, जनतेतून निवडणूक लढवण्याचे धाडस त्यांच्यात उरलेले नाही. म्हणून पाठीमागच्या दाराने विधान परिषदेवर निवडून गेले.

यावेळी यशोवर्धन मंडलिक, उपजिल्हा प्रमुख बाबू नेसरकर,युवा सेना तालुका प्रमुख गजानन गावडे , वाहतूक सेना तालुका प्रमुख सलीम मुल्ला,शिव उद्योग सेना तालुका प्रमुख सुशांत नौकुडकर, शिवसेना चंदगड तालुका सचिव अविनाश पाटील,उपतालुकाप्रमुख नामदेव सावंत, युवा सेना उपतालुकाप्रमुख कैलास बोकडे,मनोहर पाटील, विभाग प्रमुख अनिल गावडे, केदारी निवगीरे, यल्लापा पाटील, संभाजी पाटील,बाळू कडोलकर,पप्पु गावडे, श्रीकांत सुभेदार उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# मोहोळ खासदार झाल्यावर गुन्हेगारांना पाठीशी घालतील : काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** देशासाठी मेडल जिंकणाऱ्या महिला कुस्ती पट्टूवर अत्याचार करणाऱ्या ब्रिजभूषनसिंग यांचा सत्कार करणारे मुरलीधर मोहोळ जर उद्या खासदार झाले तर ते महिलांवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांच्या पाठीशी उभे राहतील, अशी घाणाघाती टीका काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली.

पुणे लोकसभेचे महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे उमेदवार आ. रविंद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ काँग्रेस भवन येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत लोंढे बोलत होते. यावेळी काँग्रेस शहर अध्यक्ष व निवडणूक समन्वयक अरविंद शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष व लोकसभा निवडणूक प्रचारप्रमुख मोहन जोशी, अ‍ॅडअभय छाजेड, कमल व्यवहारे, संजय बालगुडे, वीरेंद्र किराड, गोपाल तिवारी इत्यादी उपस्थित होते.

लोंढे म्हणाले, मोहोळ यांना महापालिकेचे स्थायीसमिती अध्यक्षपद मिळाले, महापौर पद मिळाले, या काळात त्यांनी पुणेकरांसाठी काहीच केले नाही. त्यांच्या काळातील समान पाणी पुरवठा योजनेचे काय झाले ? टक्केवारी न देणारा ठेकेदार मोहळ यांना मिळाला नाही त्यामुळे जायकाचा पैसा दोन वेळा परत गेला. महिलांच्या सॅनेटरी नॅपकीनलाही ठेकेदार मिळाला नाही. महापालिकेचा कारभार करताना

### ‘त्या’ जिल्हाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करणार

काही समाजाची मते डिलीट करण्यात आली आहेत. उमेदवाराला यादी दिल्यानंतर नावे काढण्यात आली आहे. विदर्भात एका एका केंद्रावरील १०० मते कमी आहेत. त्यामुळे मी नागपूर व चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी निवडणुक आयोगाकडे करणार असल्याचेही लोंढे यांनी सांगितले.



पुणेकरांना सेवा सुविधा देण्यास भाजप आणि मोहोळ अपयशी ठरले आहेत. देशात दहा वर्षात काहीच न केल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुरलीधर मोहोळ यांच्याकडे दाखवण्यासारखे काहीच नाही. ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे, विश्वंभर चौधरी आणि अ‍ॅड. आसिम सरोदे यांना मारणाऱ्यांमध्ये मोहोळ यांच्या पुतण्याचा समावेश होता, त्यामुळे ते खासदार झाल्यावर पुणेकर कसे सुरक्षित राहतील ? असा सवालही लोंढे यांनी केला. आमचे उमेदवार रविंद्र धंगेकर सर्वसामान्य जनतेशी जोडलेले आहेत, ते लोकांच्या हाकेला धावून जातात. त्यामुळे ते नक्की मोहोळ यांचा पराभव करतील.

### ..म्हणून राज्यात पाच टप्प्यात निवडणुका

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षात केलेल्या कारभारावर लोक नाराज आहेत. शिवाय राज्यातील कायदा व सुव्यवस्था सांभाळण्यास गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अपयश आले आहे. या दोन गोष्टींचा विचार करून राज्यात लोकसभेच्या निवडणुका पाच टप्प्यात घेतल्या जात आहेत. मोदी फेल आहेत, किंवा फडणवीस गृहमंत्री म्हणून अपयशी आहे, हे मात्र नक्की, असेही लोंढे म्हणाले.**

संविधानाची तोडफोड केली जात आहे. ईडी, सीबीआय या संस्थांचा अमर्याद वापर करून राज्यपालांच्या मदतीने राजकीय अस्वस्थता निर्माण केली जात आहे. जाती धर्मात तेढ निर्माण करून मणिपूर, छत्तीसगड राज्य पेटवली. महिलांवरील अत्याचारात भाजपचे नेते आघाडीवर आहेत. आरोपींना सोडण्यासाठी पुरावे नष्ट करत आहेत. मणिपूर मध्ये पोलिसांदेखत महिलांवर अत्याचार होत होते. त्यामुळे देशामध्ये काँग्रेसची लाट असून पहिल्या टप्प्यात भापजचा पराभव दिसू लागला आहे. राज्यातील निवडणुका झालेल्या पाचही जागा महाविकास आघाडी जिंकणार असून नितीन गडकरी हे देखील पराभूत होतील. आमच्याकडे कार्यक्रम आहे, निती आणि नियत आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हढ्या जास्त सभा घेतील, तेवढ्या जास्त जागा महाविकास आघाडी व इंडिया आघाडी जिंकेल, असा विश्वास लोंढे यांनी व्यक्त केला.

पंतप्रधानांच्या समोर मुनगंटीवार बहिण भावाबद्दल बोलले, ही त्यांची संस्कृती आहे का ? आमच्या नेत्यांच्या सभांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. आम्ही दिलेली आश्वासने पाळली, त्याचे उदाहरण कर्नाटक आहे. मोदींनी दिलेली आश्वासने पाळली का ? काहीही पाळले नाही. उलट वेदांत फॉक्सकॉन हा एक लाख रोजगार निर्मिती करणारा प्रकल्प गुजरातला पळवला. तरीही राज्यातील एक फुल दोन हाल्फ सत्तेतील नेते गप्प बसले. फडणवीस हे फौजदारचे हवालदार झाले आहेत. अजित दादा यांच्या वाट्याला चार जागा आल्या, त्याही ते हरत आहेत. राज्यात गद्दारी विरुद्ध खुद्दारी लढत आहे. मतदान कमी का झालं याचा विचार भाजपने करावा. ही लढाई लोकशाही व संविधान वाचवण्याची आहे, त्यामुळे जनता काँग्रेस व आघाडीच्या उमेदवारांना निवडून देईल, असेही लोंढे म्हणाले.

### ..म्हणून राज्यात पाच टप्प्यात निवडणुका

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षात केलेल्या कारभारावर लोक नाराज आहेत. शिवाय राज्यातील कायदा व सुव्यवस्था सांभाळण्यास गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अपयश आले आहे. या दोन गोष्टींचा विचार करून राज्यात लोकसभेच्या निवडणुका पाच टप्प्यात घेतल्या जात आहेत. मोदी फेल आहेत, किंवा फडणवीस गृहमंत्री म्हणून अपयशी आहे, हे मात्र नक्की, असेही लोंढे म्हणाले.**

# भाजपच्या पथ्यावर पडणारे मत विभाजन बौद्ध समाजाने टाळावे!

■ **श्यामदादा गायकवाड यांचे आवाहन**



**मुंबई :** कुठलाही आंबेडकरवादी, बहुजनवादी पक्ष राज्यात स्वबळावर जिंकणे दूरच, पण मोदी आणि त्यांच्या भाजपला एकट्याने कदापिही पराभूत करू शकत नाही, असे सांगतानाच या लोकसभा निवडणुकीत बौद्ध समाजाने भाजपच्या पथ्यावर पडणारे आपल्या निर्णायक मतांचे विभाजन टाळावे आणि महाविकास आघाडीच्या प्रबळ उमेदवारांना विजयी करावे, असे आवाहन ज्येष्ठ पँथर - रिपब्लिकन नेते श्यामदादा गायकवाड यांनी केले आहे. ते सोमवारी संध्याकाळी मुंबई मराठी पत्रकार संघात एका पत्रकार परिषदेत बोलत होते.

या पत्रकार परिषदेला ज्येष्ठ पँथर नेते सयाजी वाघमारे, माजी आयपीएस अधिकारी सुधाकर सुराडकर, संजय अपरांती, ज्येष्ठ पत्रकार सुनील खोबरागडे हे उपस्थित होते. त्यांनीही पत्रकार परिषदेला संबोधित करताना भाजप महायुतीच्या उमेदवारांना पराभूत करण्याचे आवाहन यावेळी केले.

यावेळची लोकसभा निवडणूक ही राज्यातील बौद्ध समाजासाठी आपले राजकीय उपद्रव मूल्य सिद्ध करून दाखवण्याची मुळीच नाही. या निवडणुकीत देशाचे संविधान आणि लोकशाही वाचवण्याचे मोठे आव्हान समोर उभे ठाकले आहे. मोदी आणि त्यांच्या भाजपला रोखणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन श्यामदादा गायकवाड यांनी यावेळी केले.

■ **बौद्ध मतांची ताकद जगजाहीर**

बौद्ध समाजाच्या एकजुटीच्या निर्णायक मतांची ताकद ही नव्याने सांगण्याची वा दाखवण्याची गोष्ट राहिलेली नाही, असे सांगून गायकवाड म्हणाले की, आंबेडकरी समाजाने आपल्या मतांची उपयुक्तता आणि उपद्रवमूल्य आजवर अनेकदा सिद्ध केले आहे. १९९० सालात एकिकृत रिपब्लिकन पक्षानेच शिवसेना - भाजप युतीला सत्तेवर येण्यापासून रोखले होते. तसेच घाटकोपरच्या रमाबाई कॉलनीतील दलित हत्याकांडानंतर १९९९ सालात त्या युतीला सत्तेतून हद्दपारसुद्धा केले होते. त्याचीच पुनरावृत्ती या लोकसभा निवडणुकीत आपल्या मतांची विभागणी टाळून आंबेडकरी समाज घडवेल आणि भाजपला रोखेल, या विषयी आमच्या मनात तिळमात्र शंका नाही, असे गायकवाड, वाघमारे, सुराडकर, अपरांती, खोबरागडे यांनी एकसुरात सांगितले.

■ **विदर्भातील ८० संघटनांचा पाठिंबा**

विदर्भातील पहिल्या टप्प्यातील मतदानापूर्वी आंबेडकरी समाजाची भाजपच्या पथ्यावर पडणारी मतविभागणी टाळण्यासाठी थोर विचारवंत डॉ. यशवंत मनोहर, डॉ. सुखदेव थोरात यांच्या नेतृत्वाखाली ८० संघटनांनी जनजागृती केली होती. त्यांनी आम्हाला पाठिंबा दिला असून भाजपच्या पराभवासाठी राज्यभरात हे काम आंबेडकरी कार्यकर्त्यांनी सर्वत्र जोरात सुरू केले आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

■ **प्रोग्रेसिव्ह रिपब्लिकन पार्टी मैदानात**

या लोकसभा निवडणुकीत भाजपचा धुव्वा उडवण्याचे उद्दिष्ट साध्य केल्यानंतर होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला अस्सल रिपब्लिकन पक्ष उभा ठाकलेला दिसेल. त्यासाठी प्रागतिक रिपब्लिकन पक्षाची उभारणी आम्ही सुरू केली आहे, अशी घोषणा श्यामदादा गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत केली.

■ **तब्बल चार तास बैठक**

पत्रकार परिषदेपूर्वी रिपब्लिकन - आंबेडकरवादी कार्यकर्त्यांची बोलावण्यात आलेली बैठक बेल्लॉर्ड इस्टेट येथे तब्बल चार तास चालली. मुंबई, ठाणे जिल्हा, नवी मुंबई, नाशिक येथून आंबेडकरी कार्यकर्ते य बैठकीसाठी आले होते. त्यात पँथर नेते सुरेश केदारे, प्रा.एम. ए.पवार, डॉ. संपत सकपाळ, ऍड.किरण चन्ने, ऍड . राजय गायकवाड, अरविंद सोनटक्के, राजू रोटे, सतीश डोंगरे, चंद्रकांत जगताप, गुणाजी बनसोडे, जयवंत हिरे, प्रकाश हिवाळे, ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ, महेंद्र पंडागळे, रमेश मोकळ, रमेश चक्रे, सुनील कदम, हेमंत मोकळ,कैलास सरोदे, अश्वजित सोनावणे, स्वप्नील कदम, तुकाराम माने, राहुल गायकवाड, प्रकाश सोनावणे, पोपट आधांगले, व्हीं. डी. म्हेत्रे, प्रवीण पाटील, हिरामण गायकवाड, गौतम सांगळे,विजय बागुल,आश्विन कांबळे, छबू घुगे,सुधाकर बर्वे आदी कार्यकर्त्यांचा समावेश होता.

## कसबा पेठ विधानसभा मतदारसंघात ३ लाख ८० हजार रुपये जप्त

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुणे लोकसभा मतदार संघाअंतर्गत कसबा पेठ विधानसभा मतदार संघात निवडणूक कामासाठी नियुक्त स्थिर सर्वेक्षण पथकामार्फत दुपारच्या सुमारास ३ लाख ८० हजार ५०० रुपये इतकी रक्कम हस्तगत केल्याची माहिती सहा. निवडणूक अधिकारी स्नेहा देवकाते यांनी दिली. फरासखाना पोलीस स्टेशन अंतर्गत शनिवार वाडा गेटसमोर एका इसमाकडून ही रक्कम जप्त केली. ही रक्कम जिल्हा कोषागार कार्यालयात जमा करण्यात आली आहे.

## अवैध दारू विक्री; एकावर गुन्हा

**सातारा :** येथील जुना मोटर स्टँड येथे गणेश शिवाजी जाधव (वय ५५, रा. आकाशवाणी झोपडपट्टी, सातारा) हा दि. २२ रोजी रात्री ७.३० वाजता पोलीस कॉन्स्टेबल संग्राम फडतरे यांना अवैध दारू विकताना आढळून आला. त्याच्यावर शाहूपुरी पोलिसात गुन्हा दाखल आहे.

# ज्येष्ठांचा सन्मान हीच आमची संस्कृती : मुरलीधर मोहोळ



### १९० ज्येष्ठ नागरिक संघांचा मोहोळ यांना पाठिंबा

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** आपल्या वडिलांनी दिलेल्या वचनाची पूर्तता करण्यासाठी श्रीरामांनी आपल्या राज्याचा चौदा वर्ष त्याग केला. माता शबरीची उष्टी बोरं खावून तिचा सन्मान केला. ज्येष्ठांचा आदर, सन्मान करा हाच धडा रामायणातून आपल्याला मिळतो. त्यामुळेच ज्येष्ठांचा सन्मान हीच आमची संस्कृती आहे. पुण्यातील ज्येष्ठ, वडिलधारे हेच माझे स्टार प्रचारक आहेत आणि त्यांच्यासाठी असणाऱ्या मोदी सरकारच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करु, असे महायुतीचे पुणे लोकसभेचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.

ऑस्कॉप, फेसकॉम, भाजप ज्येष्ठ नागरिक आघाडी आणि पुणे शहरातील सर्व १९० अंगीकृत ज्येष्ठ नागरिक संघांनी मोहोळ यांना पाठिंबा जाहीर केला. या ज्येष्ठ नागरिक मेळाव्यात मोहोळ बोलत होते. ज्येष्ठ नागरिकांच्या अ‍ॅस्कॉप संघटनेचे अध्यक्ष दिलीप पवार, कार्याध्यक्ष श्रीराम बेडकीहाळ, कोषाध्यक्ष अच्युत कुलकर्णी, सचिव ऊर्मिला शेजवलकर, तसेच उदय रेणूकर, अरुण रोडे, राजीव कुलकर्णी या पदाधिकाऱ्यांनी मेळावा आयोजनात मोलाची भूमिका बजावली. हेल्पेज इंडिया संघटनेचे वसंतराव दापोरकर, बंडोपंत फडके, अनिल कुलकर्णी, पद्माकर कुलकर्णी, सुरेखा पेंडसे, ऊषा जोईल, श्रद्धा चिटणीस आदीही उपस्थित होते.

आपल्या घरातील ज्येष्ठ किंवा वडिलधारे आपली ताकद असते असे सांगून मोहोळ म्हणाले, ‘आपल्याला कधी ना कधी तरी निराशा येते. त्यावेळी घरातील ज्येष्ठांशी संवाद साधल्यानंतर आपले नैराश्य दूर होते, हा माझा अनुभव आहे. अनेकदा मला गोंधळलेल्या मनस्थीतीत मला ज्येष्ठांच्या मार्गदर्शनातून त्यातून बाहेर पडणे शक्य झाले आहे. हे मी माझे अनुभव सांगतोय. भाजपने कायमच ज्येष्ठ नागरीकांची दखल घेतली आहे. कारण ज्येष्ठ नागरीक हे समाजातील अनुभवाची भांडारे आहेत. ज्येष्ठ, वडिलधारे माझ्यासाठी कायमच आदरणीय राहिले आहेत, पुढही रहातील. कोरोना काळात ज्येष्ठांची सेवा करण्याचे भाग्य मला मिळाले, त्यांच्या त्या आशिर्वादानेच मला या निवडणुकीत संधी मिळाली. त्यांचा आशीर्वाद माझ्यासाठी मोठा आहे. सर्वांशी कायमच गप्पा मारणारे, बोलणारे ज्येष्ठ नागरीक हेच खरे माझे स्टार प्रचारक आहेत.’

यावेळी पुणे शहरातील बहुसंख्य ज्येष्ठ नागरिक पदाधिकाऱ्यांसह राज्यसभेच्या खासदार मेधा कुलकर्णी, भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, महायुती समन्वयक संदीप खर्डेकर, शहर सरचिटणीस पुनीत जोशी, शिवसेनेचे उपशहरप्रमुख सचिन थोरात, महायुतीचे समन्वयक शाम देशपांडे, ज्येष्ठ नागरिक मेळाव्याचे समन्वयक बाळासाहेब टेमकर, कोथरूड दक्षिण मंडलचे अध्यक्ष डॉ. संदीप बुटाला, कोथरूड उत्तर मंडलचे अध्यक्ष सचिन पाषाणकर, माजी नगरसेविका उर्मिला आपटे, माजी उपमहापौर नाना नाशिककर, अनुपमा लिमये, कोथरूड सरचिटणीस अनुराधा येडके, मंजूश्री खर्डेकर, मनसे विभाग अध्यक्ष सुधीर धावडे, रिपाइंचे कोथरूड अध्यक्ष बाळासाहेब खंकाळ, शिवसेनेचे कोथरूड विभाग प्रमुख मयूर पानसरे, दीपक पवार, गिरीश खत्री, शहर चिटणीस प्रशांत हरसुले, राहुल कोकाटे, कोथरूड उपाध्यक्ष दिनेश माझिरे, अजित जगताप आदी उपस्थित होते.

## ‘त्या’ पोलिसाचे निलंबन

**सातारा :** कराड ते विटा रस्त्यावर चोराडे फाटा येथे वाहनांची तपासणी करत असताना पुणे ग्रामीणचा पोलीस कर्मचारी अजयकुमार विलास माने याने शासकीय कर्मचाऱ्याच्या कानशिलात मारुन, धक्काबुक्की, शिवीगाळ केली होती. त्यावर त्याच्यावर औंध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्याची गंभीर दखल घेत पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी त्याचे निलंबन केले असून, त्याची खात्यांतर्गत चौकशी केली जाणार आहे.

स्थिर सर्वेक्षण पथक क्र. पाच हे कराड-विटा रस्त्यावर चोराडे फाटा या पॉईंटवर कामकाज करत होते. टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभागातील लिपिक सुहास गुरव, सहकाऱ्यांसोबत संशयित वाहनांची तपासणी करत होते. दि. १७ रोजी मध्यरात्री २. १७ वाजण्याच्या सुमारास गाडी तपासतेवेळी ’मी पोलीस आहे, ओळखपत्र दाखवू का, मी आमदार, खासदाराच्या गाड्या चेक करतो, तुमची लायकी आहे काय’ असे म्हणून अजय माने याने हुज्जत घातली. तसेच मला घाणेरड्या भाषेत शिवीगाळ केली. पुन्हा हुज्जत घालून कानाखाली मारली. तो गाडी सुरु करुन निघून जाण्याचा प्रयत्न करत असताना गाडीची चावी सुहास गुरव यांनी काढून घेतली. त्यामुळे अजय माने याने पुन्हा गुरव यांच्या कानशिलात लगावली.

# निवडणुकीच्या काळात ‘चोरांची लोकशाही’ पुस्तक येणे महत्वाचे संकेत

■ **लेखक व पत्रकार डॉ. रवींद्र गुर्जर यांचे मत**

■ **अनिल पाटील लिखित ‘चोरांची लोकशाही’ पुस्तकाचे प्रकाशन**

**पुणे :** ‘सर्व विरोधक जर एकत्र आले, तर निश्चित समजावे की राजा प्रामाणिक आहे. दोन हजार वर्षापूर्वी आर्य चाणक्याने जे लिहून ठेवले, ते आजही सर्वार्थाने लागू आहे. याचे सांगण्याचे प्रयोजन म्हणजे आता होऊ घातलेली लोकसभा निवडणूक असून याच काळात ही पुस्तक प्रकाशित होणे महत्वाचे संकेत आहे. असे मत कार्यक्रमाचे लेखक व पत्रकार डॉ. रवींद्र गुर्जर यांनी व्यक्त केले.




**‘चोरांची लोकशाही’ पुस्तक प्रकाशनावेळी डाव्या बाजूने अनिता पाटील, लेखक अनिल पाटील, चंद्रकांत शहासने, डॉ. रविंद्र गुर्जर, बबन पोतदार आणि डॉ. सदानंद बोरसे.**

मतदार जागृतीसाठी आणि समृध्द लोकशाहीसाठी माजी वायुसेना व माजी पोलिस अधिकारी अनिल शां. पाटील यांनी लिहिलेल्या ‘चोरांची लोकशाही’ या पुस्तकाचे प्रकाशन टिळक रोड येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या पद्मजी हॉल येथे लेखक व पत्रकार डॉ. रवींद्र गुर्जर, ज्येष्ठ साहित्यिक आणि कथाकार बबन पोतदार, राजहंस प्रकाशनचे संपादक डॉ. सदानंद बोरसे आणि देशभक्त कोशकार चंद्रकांत शहासने, व प्रतिभा पाटील या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी सेलिब्रेशन ॲट सिक्टी या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्ती प्रकाशित करण्यात आली. यावेळी अनिता पाटील व प्रतिभा पाटील या उपस्थित होत्या.

डॉ. रवींद्र गुर्जर म्हणाले,‘‘ जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतामधील वास्तव परिस्थिती काय आहे. लोकशाही खरोखर अस्तित्वात आहे का. भ्रष्टाचाराने पोखरलेल्या देशात खरे राष्ट्रनिष्ठ आणि सर्वस्व झोकून देण्याची तयारी असलेल्या लोकांचे प्रमाण किती आहे, हे तपासणे गरजेचे आहे. पंतप्रधान पं. नेहरू गेल्यानंतर देशासमोर प्रश्न पडला होता की पुढील पंतप्रधान कोण आहे. पण लोकशाहीने ते दाखवून दिले. तसेच नरेंद्र मोदी नंतर ही या देशात बरेच पंतप्रधान येतील.

चंद्रकात शहासने म्हणाले,‘‘ आम्ही चोर आहोत हे ज्या दिवशी या देशात थांबेल तेव्हाच आम्ही विश्वगुरू बनेल. संविधाच्या आधारावर चाललेल्या या देशात कालानुरूप काही चुका आहेत. त्याचे आता परिक्षण होणे गरजेचे आहे. सर्वसामान्यांचा संभ्रम, चीड, संताप, अगतिकता या सर्व गोष्टी लेखकाने पुस्तकात मांडल्या आहेत.

डॉ. सदानंद बोडसे म्हणाले, ‘‘ भ्रष्टाचारी सदैव अस्तित्वात राहतात याला आपणच जवाबदार आहोत. अशावेळेस चोरांच्या विरोधात उभे राहणे गरजेचे आहे. देशात लोकशाही टिकवायची असेल तर मतदातांनी सजग होऊन चिंतन, मनन करून योग्य मतदान करावे. कोणतीही सुधारणा करावयाची असेल तर मतभेद होणे ही गरजेचे आहे.

बबन पोतदार म्हणाले, ‘‘ चोरांची लोकशाही सारखे पुस्तकांची निर्मिती होणे म्हणजे सर्वांना विचार करण्याची वेळ आली आहे. वाढता भ्रष्टाचार हा देशाला पोरखून ठेवणारा आहे. अशावेळेस मतदातांनी जागृत राहून संविधानाचा अभ्यास करावा आणि भ्रष्टाचाराला प्रतिबंध घालावा.

अनील पाटील म्हणाले,‘‘ देश स्वतंत्र होऊन ७५ वर्षे पूर्ण झालीत परंतू आज ही हा देश बर्याच समस्यांनी ग्रस्त आहे. स्वातंत्र्यानंतर कल्याणकारी योजनांचा पाऊस पडला खरे परंतू गरिबी काही संपली नाहीच परंतू भ्रष्ट लोकांमुळे आज लोकशाहीला नुकसान पोहचले आहे. चोरांची लोकशाही हा विषय गेल्या ८वर्षापासून डोक्यात होता. या पुस्तकात संविधान, हक्क आणि कर्तव्य, राजकारणात गुन्हेगारांचा प्रवेश, घराणेशाही, न्यायव्यवस्था, भ्रष्टाचार, प्रसार माध्यमे यांचा उहापोह केलेला आहे.

सूत्रसंचालन प्रा. अतुल कुलकर्णी यांनी केले. आकाश पाटील यांनी आभार मानले.

### वडगावचे ग्रामदैवत श्री पोटोबा महाराजांचे दर्शन घेऊन

# श्रीरंग बारणे यांच्या मावळातील प्रचाराचा शुभारंभ

**राजदंड / वडगाव मावळ**

वडगाव मावळ येथील ग्रामदैवत श्री पोटोबा महाराज यांच्या चैत्र पौर्णिमा उत्सवानिमित्त आशीर्वाद घेऊन मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना - भाजप - राष्ट्रवादी - मनसे - आरपीआय - रासप - मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी आज (मंगळवारी) मावळ तालुक्यातील प्रचाराचा शुभारंभ केला.

खासदार बारणे यांनी काल (सोमवारी) उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर आज मावळ तालुक्यापासून त्यांनी प्रचाराच्या दुसऱ्या फेरीला सुरुवात केली. त्यांच्या समवेत आमदार सुनील शेळके, भाजपचे मावळ तालुका निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे, मावळ पंचायत समितीचे माजी सभापती गुलाबराव म्हाळसकर, राष्ट्रवादीचे नेते सुभाष जाधव, गणेश आप्पा ढोरे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे, तालुकाप्रमुख राजेश खांडभोर तसेच प्रवीण चव्हाण, सुनील चव्हाण, अविनाश चव्हाण, ॲड. अशोक ढमाले, अरुण चव्हाण, मनोज ढोरे, अविनाश बवरे, दीपक बवरे, अरविंदपंत पिंगळे, चंद्रशेखर भोसले चऱ्होलीकर, तुकाराम ढोरे, सुधाकर ढोरे, अनंता कुडे, मारुती चव्हाण सुनील ढोरे, सुनील मोरे, रवींद्र देशपांडे, नवनाथ हारपुडे आदी पदाधिकारी व महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

■ **मदन बाफना यांची भेट..**

माजी राज्यमंत्री मदन बाफना व खासदार बारणे यांची श्री पोटोबा महाराज मंदिराच्या दारात भेट झाली. देवाच्या दारीच आपली भेट झाली, असा मिश्किल शेरा बाफना यांनी यावेळी मारला व बारणे यांना शुभेच्छा दिल्या.

वडगावचे नगराध्यक्ष मयूर ढोरे तसेच सुनील चव्हाण, पंढरीनाथ



ढोरे यांच्या निवासस्थानी खासदार बारणे यांनी सदिच्छा भेट दिली. पाच पावली खंडोबा मंदिर तसेच विजय मारुती मंदिर येथे जाऊन त्यांनी दर्शन घेतले. वडगावच्या बाजारपेठेतून प्रचार फेरी काढून त्यांनी मतदारांशी संपर्क साधला. ठिकठिकाणी औक्षण व सत्कार करून बारणे यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

■ **विकासासाठी सहकार्याचे ग्रामस्थांना आवाहन..**

कान्हे येथील श्री भैरवनाथ महाराज व श्री हनुमान जयंती उत्सवातही बारणे यांनी हजेरी लावली. त्यावेळी आमदार सुनील शेळके तसेच रवींद्र भेगडे, प्रशांत ढोरे, गुलाब म्हाळसकर, निवृत्ती शेटे, रवींद्र देशपांडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते होते. ग्रामस्थांच्या वतीने किशोर सातकर, गिरीश सातकर, राजेंद्र सातकर, सतीश सातकर, बंडोबा सातकर, उत्तम सातकर, देवराम सातकर, स्वप्नील मोढवे, लक्ष्मण ठाकर आदींनी बारणे यांचे स्वागत केले.

आमदार शेळके म्हणाले की, ही गावकी-भावकीची, नात्यागोत्यांची निवडणूक नाही तर देश कोणाच्या हातात द्यायचा, यासाठी मतदान करायचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश झपाट्याने प्रगती करत आहे. देशहितासाठी त्यांनाच पुन्हा पंतप्रधान करणे आवश्यक आहे. खासदार बारणे यांना दिलेले मत हे मोदींना दिलेले मत असणार आहे.

कान्हे येथील रेल्वे उड्डाणपूलाबाबत ग्रामस्थांनी सहकार्याची भूमिका घ्यावी, असे आवाहन खासदार बारणे यांनी केले. मावळात आणखी औद्योगिक विकास होणार असून त्याद्वारे मावळातील युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल, असे बारणे यांनी यावेळी सांगितले. देशातील नागरिकांनी विकासाला मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# कोल्हापुरात शाहू महाराजांची ताकद वाढली

कोल्हापुर : यंदाच्या लोकसभा निवडणुकीत कोल्हापूर मतदारसंघात मोठी लढत पाहायला मिळणार आहे. कोल्हापूरचे विद्यमान खासदार आणि शिवसेनेचे (शिंदे गट उमेदवार संजय मंडलिक यांना छत्रपती शाहू महाराज द्वितीय यांनी आव्हान दिलं आहे. शाहू महाराज काँग्रेसच्या तिकीटावर कोल्हापूरमधून लोकसभा निवडणूक लढवत आहेत. दोन तुल्यबळ उमेदवारांमधील ही लढत रंगतदार होणार आहे. दरम्यान, कोल्हापुरात शाहू महाराजांची ताकद वाढली आहे. कारण या मतदारसंघात महाविकास आघाडीतले सर्व पक्ष शाहू महाराजांबरोबर आहेतच. त्यांच्याबरोबर इतर लहान मोठे पक्षदेखील (जे महायुतीत नाहीत) शाहू महाराजांबरोबर आहेत. अशातच एका मोठ्या पक्षाने शाहू महाराजांना पाठींबा दर्शवला आहे. ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाने शाहू महाराजांना पाठिंबा जाहीर केला आहे.



एआयएमआयएम पक्षाचे छत्रपती संभाजीनगरचे (औरंगाबाद) खासदार इम्तियाज जलील यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेऊन शाहू महाराजांना पाठिंबा जाहीर केला आहे. जलील यांनी छ. संभाजीनगरमध्ये पत्रकार परिषद घेतली होती.

यावेळी खासदार जलील म्हणाले, शाहू महाराज किंवा म विआने आमच्याकडे पाठिंब्याची मागणी केली नव्हती. मात्र आम्ही स्वत:हून या निवडणुकीत त्यांच्या बाजूने उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे.

इम्तियाज जलील म्हणाले, आम्ही (महाराष्ट्र एमआयएम) एक निर्णय घेतला आहे, या निर्णयाबाबत आम्ही आमच्या पक्षाचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांच्याशीदेखील चर्चा केली आहे. आम्ही कोल्हापूरचे मविआचे उम `दवार शाहू महाराज यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व राजकीय पक्षांमध्ये केवळ वाईटच लोक असतात असं काही नसतं. आमच्या विरोधात असणाऱ्या पक्षांच्या बाबतीतही हे तितकंच मोठं सत्य आहे. त्यामुळे मी आमच्या कोल्हापूरमधील एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांना सांगितलं आहे की तुम्ही शाहू महाराजांचं समर्थन करा. शाहू महाराजांनी मला फोन केला नाही किंवा समर्थन मागितलेलं नाही. आम्ही स्वत:हून त्यांच्याबरोबर उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे.

खासदार जलील म्हणाले, अनेक राजकीय पक्ष छत्रपती शाहू महाराजांच्या नावाने राजकारण करत आहेत. त्यांच्याविरोधात उमेदवार उभे करत आहेत. शाहू महाराज कोण आहेत, त्यांचे कोल्हापुरात काय स्थान आहे याची विरोधकांना कल्पना नसावी. आम्ही स्वत:हून त्यांना पाठिंबा द्यायचे ठरवले आहे. याबाबत मी असदुद्दीन ओवैसी यांनादेखील सांगितले आहे. मी त्यांना म्हटले की, अनेक चांगले खासदारही आम्ही पाहिले आहेत. त्यांना आपण मदत करण्याची आवश्यकता आहे. म्हणून आम्ही कोल्हापूरच्या शाहू महाराजांना पाठिंबा देत आहोत. आम्हाला कोणी पाठिंबा मागितलेला नाही, आम्ही स्वत:हून त्यांना समर्थन देत आहोत.

# नार्वेकर यांच्याशी संपर्क नाही, मात्र आले तर स्वागतच करू

## शिंदे गटाचे संजय शिरसाट यांचे मोठे वक्तव्य

**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) :** द्धव ठाकरेंचे निकटवर्तीय मिलिंद नार्वेकर यांच्याशी संपर्क नाही; मात्र ते आले तर त्यांचे स्वागत असेल असे मत शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी व्यक्त केले. उबाठा गटाचे अनेक कार्यकर्ते आणि नेते, आमदार शिंदेंकडे येण्यास उत्सुक आहेत. मिलिंद नार्वेकरसुद्धा मातोश्रीशी संबंधित आहेत. ते येत असतील तर स्वागत आहे; मात्र आमचा त्यांच्याशी कोणताही संपर्क नाही, असे त्यांनी सांगत नार्वेकर यांना तिकीट देण्याच्या प्रश्नावर उत्तर दिले. तर शरद पवार यांच्या पुस्तकात उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्री काळातील संदर्भ लिहिलेला असल्याने त्यांच्याबद्दल करण्यात येत असलेली टीका बरोबरच आहे, असे त्यांनी सांगितले.



शरद पवार यांच्यावर विश्वास नाही : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अमित शाह आणि भाजपा सोबत झालेल्या बैठक बाबत माहिती सांगितली. यांच्या बैठका अनेक वेळा झाल्या. गुप्त बैठका होत्या, असं म्हणालो तरी प्रत्येक ठिकाणी ण्ऊ% निघू शकतात. शरद पवार यांच्या विषयीची माहिती येईल. शरद पवार यांच्यावर कुणी विश्वास ठेवत नाही. त्यांनी दिलेला शब्द अजित पवार यांनी पाळला. बावनकुळे यांनी पवार यांच्यावर टीका केली. त्यावर बोलताना शरद पवार यांनी शेतकऱ्यांचे भले केले नाही. आज शेतकरी यांना मानणारा वर्ग दूर झाला आहे. शेतकऱ्याच्या मनात राग आहे, असे देखील शिरसाट यांनी सांगितले.

बावनकुळे यांची टीका वैयक्तिक : भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांची राजकारणातील नालायक माणूस अशी तुलना केली. त्यावर बोलताना त्यांची वैयक्तिक टीका आहे; मात्र असं असलं तरी उबाठाचे नेते उद्धव ठाकरे बोलले ते संयुक्तिक नव्हते. मुलाला मुख्यमंत्री करायला देवेंद्र फडणवीस यांच्याकडे क्लास घ्यावे लागत असतील तर हे राजकारण कुटुंबापर्यंत मर्यादित असे म्हणावे लागेल. त्यांनी लोकांचा विश्वास गमावला आहे. याचा अर्थ नैतिकता गमावली आहे, अशी टीका शिरसाट यांनी केली.

२५ तारखेला मुख्यमंत्री शहरात : शिवसेना शिंदे गटाची लोकसभा उमेदवारी संदीपान भुमरे यांना देण्यात आली आहे. त्यांचा उमेदवारी अर्ज २५ एप्रिल रोजी भरण्यात येणार आहे. त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वत: येणार असून गुलमंडी येथे जाहीर सभा घेण्यात येणार आहे. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज सादर केला जाईल, अशी माहिती संजय शिरसाट यांनी दिली.

# बच्चू कडूंचा रवी राणांना इशारा

**मुंबई :** अचलपूरचे आमदार बच्चू कडू यांचा प्रहार जनशक्ती पक्ष महायुतीमधील सदस्य पक्ष असला तरा बच्च कडूंचा गेल्या काही महिन्यांपासून महायुतीशी संघर्ष चालू आहे. कडू यांनी भारतीय जनता पार्टीवरील त्यांची नाराजी सातत्याने बोलून दाखवली आहे. भाजपा महायुतीतल्या छोट्या पक्षांना योग्य पद्धतीने वागवत नसल्याचा आरोपही कडू यांनी अनेक वेळा केला आहे. तसेच अमरावतीत बच्चू कडू आणि विद्यमान खासदार तथा भाजपाच्या अमरावती लोकसभेच्या उमेदवार नवनीत रणा यांच्यात गेल्या अनेक वर्षापासून संघर्ष चालू आहे. भाजपाने नवनीत राणा यांना लोकसभेची उमेदवारी देताना मित्रपक्षांचं म्हणणं ऐकून घेतलं नाही, असा आरोप बच्चू कडू यांनी केला आहे. त्यामुळे बच्चू कडू यांनी अमरावतीत प्रहारकडून दिनेश बूब यांना लोकसभेचं तिकीट दिलं आहे. अमरावतीत नवनीत राणा, त्यांचे पती आणि बडनेराचे आमदार रवी राणा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाजपाचा प्रचार करत आहेत. तर बच्चू कडू हे दिनेश बूब यांचा प्रचार करत आहेत. या प्रचारादरम्यान, राणा दाम्पत्य बच्चू कडूंवर आणि बच्चू कडू राणा दाम्पत्यावर टीका करत आहेत.

आमदार रवी राणा यांनी प्रचारादरम्यान प्रहारचे उमेदवार दनेश बूब यांच्यावर टीका केली होती. तसेच ते जुगार खेळतात, मद्यप्राशन करतात असा आरोपही केला होता. या आरोपांना आता आमदार बच्चू कडू यांनी उत्तर दिलं आहे. बच्चू कडू म्हणाले, रवी राणांनी दिनेश बूब किंवा इतर कुठल्याही नेत्यावर व्यक्तीगत टीका करू नये. आम्ही जर त्यांच्या व्यक्तीगत गोष्टी बाहेर काढल्या तर ते त्यांना कठीण जाईल. त्यामुळे त्यांनी असं करू नये. सार्वजनिक जीवनात तो माणूस म्हणजेच दिनेश बूब हा रवी राणांपेक्षा लाख पटीने चांगला आहे. त्यांनी ज्या पद्धतीने कामं केली आहेत ते पाहता मला नाही वाटत की, रवी राणा हे त्यांची बरोबरी करू शकतील. आपण तर त्यांचे (नवनीत राणा) चित्रपटातले सीन (प्रसंग) पाहिले तर त्यात ते खुलेआम मद्यप्राशन करताना दिसतात. मात्र आम्ही या गोष्टी काढायला नाही पाहिजेत आणि आम्ही तो नियम पाळतो. तुम्ही इतक्या खालच्या पातळीवर जात असाल तर तुमच्याही गोष्टी बाहेर येतील. व्यक्तिगतरित्या इतक्या खालच्या पातळीवर जाऊन आरोप करणं योग्य नाही.

बच्चू कडू म्हणाले, नवनीत राणा यांना पाडण्यासाठी सर्वात मोठा हातभार कोणाचा असेल तर तो रवी राणांचा अशेल. त्यांची जी भाषा आहे आणि ते व्यवस्थित वागले असते तर ही वेळ आली नसती. पण आता नवनीत राणा यांना निवडणुकीमध्ये पाडण्याचे श्रेय रवी राणा यांना जाईल.

दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमरावतीतल्या दर्यापूर नवनीत राणांच्या प्राचार्थ आयोजित सभेला संबोधित करताना महायुतीतल्या सर्व प्रमुख नेत्यांचा आणि पक्षांचा उल्लेख केला. मात्र फडणवीसांनी बच्चू कडू आणि त्यांच्या पक्षाचा उल्लेख करणे टाळले. त्यामुळे बच्चू कडूंच्या पक्षाला महायुतीतून बाहेर काढल्याची चर्चा रंगू लागली आहे. यावरही बच्चू कडूंनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी आमचा उल्लेख केला नाही, आमच्या पक्षाचे नाव घेतले नाही याबाबत मी त्यांचा आभारी आहे. त्यांनी आमचे नाव घेतले नाही ते बरे केले. कारण त्यांनी आमचे नाव घेतले असते तर लोकांच्या मनात शंका निर्माण झाल्या असत्या. त्यामुळेच त्यांनी आमचेच काम केले आहे.

# आश्वासने दिली ते पूर्ण करतो : नितीन गडकरी



**नांदेड :** लोकसभा निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाच्या रणधुमाळीची सांगता झालीय. पूर्व विदर्भातील पाच मतदासंघातील मतदारांचा कौल मतपेटीत बंद झाला असून, अनेक दिग्गज नेत्यांचे भवितव्य आता निकालानंतर ठरणार आहे. नितीन गडकरी यांच्या मतदारसंघाचे मतदान झाले असून, आता ते राज्यातील इतर भागात प्रचार सभा घेत आहेत.

मी फोकनाड लिडर नाही : ''मी फोकनाड लीडर नाही, जे आश्वासने दिले आहे ते पूर्ण करणार,'' असे आश्वासन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिलेय. नांदेड लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या देगलूर येथील प्रचार सभेत गडकरी बोलत होते. ''शेतकऱ्यांच्या समृद्ध आणि संपन्नतेसाठी पुढील काळात इथेनॉलवर भर दिला जाणार आहे. यामुळेंशेतकऱ्यांना मोठी मदत होणार आहे. यामुळे जनतेने भाजपाला मतदान द्या,'' असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलेय.

१६ लाख कोटी रुपयाचे पेट्रोल, डिझेल आयात : नितीन गडकरी पुढे म्हणाले की, ''मी जे बोलतो ते करुन दाखवतो. तूर, गहू, तांदूळ लावून शेतकऱ्याची प्रगती होऊ शकत नाही. शेतकऱ्यांनी अन्न पिकवून सर्व जनतेची सोय केली. बळीराजा मात्र, सुखी-समृद्धी झाला नाही. खताच्या, बियाण्याच्या, कापडाच्या किंमती वाढल्या. तसेच गहू महाग झाला. ब्रेड, बिस्कीट महाग होतात, संत्रा-मोसंबी स्वस्त होतात आणि ज्यूस महाग होतो. आमचं सरकार २००४ पासून लढत होते. त्या काळात १६ लाख कोटी रुपयाचे पेट्रोल, डिझेल इंधन आयात करत होतो. उसाच्या रसापासून, उसाच्या मळीपासून, बांबूपासून आणि सडलेल्या अन्नापासून इथेनॉल आपल्या इथे तयार होत आहे. त्यामुळे इंधनाची आयात कमी झाली असून, देशावर इंधनाच्या लागणारा खर्च कमी झाला.''

सरकार प्रयत्नशील : ''मागील १० वर्षाच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या कानाकोपऱ्यात रस्ते आणि पायाभूत सुविधा पोहोचवण्याचे काम मोठ्या प्रमाणावर झाले. महामार्गाच्या माध्यमातून गावं-तालुक्यांची ठिकाणे मोठ्या शहरांना जोडण्यात आली. यामुळे गावांचा प्रगतीचा मार्ग अधिक सुकर झाला. यापुढंही स्मार्ट सिटीसोबतच स्मार्ट व्हिलेजची संकल्पना देखील प्रत्यक्षात आणण्यासाठी आमचे सरकार प्रयत्नशील आहे. आजवर जनतेने आमच्यावर दाखवलेल्या विश्वासामुळंच हे शक्य झालेय. यापुढेही जनता सहकार्य करेल,'' असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केलाय.

# सुशीलकुमारांची भाजपच्या दिवंगत माजी खासदाराच्या घरी भेट

**सोलापूर :** सोलापूर लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या प्रणिती शिंदे आणि भाजपचे राम सातपुते यांची लढत चुरशीची होत असताना प्रचाराबरोबरच राजकीय डावपेचही आखले जात आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी भाजपचे दिवंगत माजी खासदार लिंगराज वल्याळ यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून त्यांच्या निवासस्थानी घेतलेली धाव आणि त्यावेळी भाजपमधील असंतुष्ट मंडळींशी घेतलेली भेट हा चर्चेचा विषय ठरला आहे.

लिंगराज वल्याळ हे पश्चिम महाराष्ट्रातील भाजपचे पहिले आमदार होते. ते १९९० साली सोलापूर शहर उत्तर मतदारसंघातून विधानसभेवर निवडून गेले होते. नंतर १९९५ साली पुन्हा दुसऱ्यांदा ते आमदार झाले असता पुढच्याच वर्षी, १९९६ साली मध्यावधी लोकसभा निवडणुका झाल्या. त्यावेळी वल्याळ हे भाजपकडून निवडून आले होते. सोलापुरातील भाजपचे ते पहिलेच आमदार आणि पहिलेच खासदार होते. त्यांचे पुत्र नागेश वल्याळ हे भाजपचे नगरसेवक होते. परंतु सध्या ते भारत राष्ट्र समिती (बीआरएस) पक्षात आहेत. दरम्यान, लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना लिंगराज वल्याळ यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे भवानी पेठेतील घोंगडे वस्तीत वल्याळ यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली.

यावेळी भाजपमध्ये असंतुष्ट समजले जाणारे सोलापूर महापालिकेचे माजी सभागृह नेते सुरेश पाटील यांच्यासह वल्याळ यांच्याबरोबर १९८५ ते १९९० पर्यत महापालिका सभागृहात राहिलेले प्रभाकर जामगुंडे, भाजपमधून काँग्रेसमध्ये आलेले प्रा. अशोक निंबर्गी आदी उपस्थित होते. यावेळी सुशीलकुमारांचे स्वागत करण्यात आले. यासंदर्भात बोलताना त्यांनी यात कसलेही राजकारण नसल्याचा खुलासा केला.

# मशाल गिताच्या नोटीसवरून फडणवीसांचा ठाकरेंवर निशाणा

**यवतमाळ :** शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्या प्रचार गिताला निवडणूक आयोगाने नोटीस पाठवली आहे. मशालसाठी गीतातले दोन शब्द काढायला सांगितले. हिंदू हा तुझा धर्म आणि जय भवानी हे ते दोन शब्द, काढायला सांगितल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले. आम्ही भवानीच्या नावाने मत मागितलं नाही, त्यामुळे आम्ही शब्द काढणार नाही असं उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केलं. तसंच उद्धव ठाकरेंनी भाजपवरही निशाणा साधला.

मध्य प्रदेश, तेलंगणा, कर्नाटकात निवडणूक झाली. तेव्हा आपले पंतप्रधान म्हणाले की, बजरंगबली म्हणून बटन दाबा, अमित शहा म्हणाले तुम्ही मतदान द्या, आम्ही रामलल्लाचे दर्शन घडवू. ह्यावर निवडणूक आयोगाकडे लेखी विचारणा केली होती. आमच्यावर आधी कारवाई करणार असाल तर मोदी, शहांवर कारवाई करावी, अशी मागणी उद्धव ठाकरेंनी केली.

उद्धव ठाकरेंच्या या मागणीवर देवेंद्र फडणवीसांनी प्रत्युत्तर दिलं आहे. 'हा त्यांच्यातला आणि निवडणूक आयोगामधला प्रश्न आहे, त्याच्याशी आम्हाला देणंघेणं नाही. ज्यांनी हिंदुत्व सोडलंय त्यांनी आपल्या गाण्यात तरी जय भवानी का आणावं? असा प्रश्न निर्माण होऊच शकतो', असा टोला फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना लगावला आहे. मोदी-शाह यांनी बजरंग बलीच्या नावाने मतं मागितली, दिलं आहे.

# उदय सामंत यांच्या ताफ्यावर हल्ला



**यवतमाळ :** लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याचं मतदान आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. दुसऱ्या टप्प्याचं मतदान २६ एप्रिलला होणार आहे, यासाठी सगळ्याच राजकीय पक्षांकडून जोरदार प्रचार सुरू आहे. निवडणुकीआधीचा शेवटचा रविवार असल्यामुळे सगळ्याच राजकीय पक्षांचे प्रमुख नेते सभा घेण्यावर भर देत आहेत. यवतमाळमध्येही महायुतीची प्रचार सभा आहे, या सभेवेळी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या ताफ्यातील वाहनावर दगड फेकण्यात आला आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे यवतमाळमध्ये सभेसाठी आले आहेत. फडणवीस यांच्यासोबत उद्योग मंत्री उदय सामंतही आहेत, यावेळी अज्ञात व्यक्तीने दगड भिरकावून उदय सामंत यांच्या ताफ्यातील गाडीवर हल्ला केला. या हल्ल्यात उदय सामंत यांच्या ताफ्यातील गाडीची काच फुटली आहे. राळेगावमधील प्रचारसभेवेळी ही घटना घडली आहे.

यवतमाळ जिल्ह्यात महायुतीच्या उमेदवार राजश्री पाटील यांच्या प्रचारासाठी जात असताना वाटेत अज्ञातांनी उदय सामंत यांच्या कारच्या ताफ्यावर दगडफ `क केली. या दगडफेकीमध्ये कुणीही जखमी झालेलं नाही. दगडफेक नेमकी कुणी केली, याचा शोध पोलीस घेत आहेत.


# कोल्हापुरात शाहू महाराजांची ताकद वाढली, एमआयएमचा पाठिंबा

**कोल्हापुर :** यंदाच्या लोकसभा निवडणुकीत कोल्हापूर मतदारसंघात मोठी लढत पाहायला मिळणार आहे. कोल्हापूरचे विद्यमान खासदार आणि शिवसेनेचे (शिंदे गट उमेदवार संजय मंडलिक यांना छत्रपती शाहू महाराज द्वितीय यांनी आव्हान दिलं आहे. शाहू महाराज काँग्रेसच्या तिकीटावर कोल्हापूरमधून लोकसभा निवडणूक लढवत आहेत. दोन तुल्यबळ उमेदवारांमधील ही लढत रंगतदार होणार आहे. दरम्यान, कोल्हापुरात शाहू महाराजांची ताकद वाढली आहे. कारण या मतदारसंघात महाविकास आघाडीतले सर्व पक्ष शाहू महाराजांबरोबर आहेतच. त्यांच्याबरोबर इतर लहान मोठे पक्षदेखील (जे महायुतीत नाहीत) शाहू महाराजांबरोबर आहेत. अशातच एका मोठ्या पक्षाने शाहू महाराजांना पाठींबा दर्शवला आहे. ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाने शाहू महाराजांना पाठिंबा जाहीर केला आहे.

एआयएमआयएम पक्षाचे छत्रपती संभाजीनगरचे (औरंगाबाद) खासदार इम्तियाज जलील यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेऊन शाहू महाराजांना पाठिंबा जाहीर केला आहे. जलील यांनी छ. संभाजीनगरमध्ये पत्रकार परिषद घेतली होती. यावेळी खासदार जलील म्हणाले, शाहू महाराज किंवा मविआने आमच्याकडे पाठिंब्याची मागणी केली नव्हती. मात्र आम्ही स्वत:हून या निवडणुकीत त्यांच्या बाजूने उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे.

इम्तियाज जलील म्हणाले, आम्ही (महाराष्ट्र एमआयएम) एक निर्णय घेतला आहे, या निर्णयाबाबत आम्ही आमच्या पक्षाचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांच्याशीदेखील चर्चा केली आहे. आम्ही कोल्हापूरचे मविआचे उमेदवार शाहू महाराज यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.



# शिंदे गटाचे संजय शिरसाट यांचे मोठे वक्तव्य

**छत्रपती संभाजीनगर :** उद्धव ठाकरेंचे निकटवर्तीय मिलिंद नार्वेकर यांच्याशी संपर्क नाही; मात्र ते आले तर त्यांचे स्वागत असेल असे मत शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी व्यक्त केले. उबाठा गटाचे अनेक कार्यकर्ते आणि नेते, आमदार शिंदेंकडे येण्यास उत्सुक आहेत. मिलिंद नार्वेकरसुद्धा मातोश्रीशी संबंधित आहेत. ते येत असतील तर स्वागत आहे; मात्र आमचा त्यांच्याशी कोणताही संपर्क नाही, असे त्यांनी सांगत नार्वेकर यांना तिकीट देण्याच्या प्रश्नावर उत्तर दिले. तर शरद पवार यांच्या पुस्तकात उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्री काळातील संदर्भ लिहिलेला असल्याने त्यांच्याबद्दल करण्यात येत असलेली टीका बरोबरच आहे, असे त्यांनी सांगितले.





शरद पवार यांच्यावर विश्वास नाही : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अमित शाह आणि भाजपा सोबत झालेल्या बैठक बाबत माहिती सांगितली. यांच्या बैठका अनेक वेळा झाल्या. गुप्त बैठका होत्या, असं म्हणालो तरी प्रत्येक ठिकाणी ण्ऊ% निघू शकतात. शरद पवार यांच्या विषयीची माहिती येईल. शरद पवार यांच्यावर कुणी विश्वास ठेवत नाही. त्यांनी दिलेला शब्द अजित पवार यांनी पाळला. बावनकुळे यांनी पवार यांच्यावर टीका केली. त्यावर बोलताना शरद पवार यांनी शेतकऱ्यांचे भले केले नाही. आज शेतकरी यांना मानणारा वर्ग दूर झाला आहे. शेतकऱ्याच्या मनात राग आहे, असे देखील शिरसाट यांनी सांगितले.

बावनकुळे यांची टीका वैयक्तिक : भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांची राजकारणातील नालायक माणूस अशी तुलना केली. त्यावर बोलताना त्यांची वैयक्तिक टीका आहे; मात्र असं असलं तरी उबाठाचे नेते उद्धव ठाकरे बोलले ते संयुक्तिक नव्हते. मुलाला मुख्यमंत्री करायला देवेंद्र फडणवीस यांच्याकडे क्लास घ्यावे लागत असतील तर हे राजकारण कुटुंबापर्यंत मर्यादित असे म्हणावे लागेल. त्यांनी लोकांचा विश्वास गमावला आहे. याचा अर्थ नैतिकता गमावली आहे, अशी टीका शिरसाट यांनी केली.

२५ तारखेला मुख्यमंत्री शहरात : शिवसेना शिंदे गटाची लोकसभा उमेदवारी संदीपान भुमरे यांना देण्यात आली आहे. त्यांचा उमेदवारी अर्ज २५ एप्रिल रोजी भरण्यात येणार आहे. त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वत: येणार असून गुलमंडी येथे जाहीर सभा घेण्यात येणार आहे. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज सादर केला जाईल, अशी माहिती संजय शिरसाट यांनी दिली.


# ''२०१४ च्या निवडणुकीचा निकाल यायच्या आधीच'', अजित पवारांचा नवा गौप्यस्फोट

**मुंबई :** अजित पवारांच्या बंडानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट पडले आहेत. हे दोन्ही गट सातत्याने एकमेकांवर टीका-टिप्पणी करत आहेत. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचे सहकारी शरद पवारांबाबत वेगवेगळे गौप्यस्फोट करत आहेत, शरद पवारांवर वेगवेगळे आरोप करत आहेत. शरद पवार हे सातत्याने भाजपाच्या बाजूने भूमिका घेत होते, असा आरोप अजित पवार, प्रफुल्ल पटेल, अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यासह अजित पवार गटातील अनेक नेत्यांनी केला आहे. तसेच शरद पवार २०१४ च्या आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकांचे निकाल हाती आल्यावर भाजपाच्या बाजूने जाण्याबाबत बोलत होते, असाही आरोप अजित पवार गटातील नेत्यांनी यापूर्वी केला आहे. दरम्यान, आता अजित पवार यांनी थेट शरद पवार यांचं नाव न घेता नवा गौप्यस्फोट केला आहे.

अजित पवार अमरावती येथे भाजपा उमेदवार नवनीत राणा यांच्या प्रचारसभेत केलेल्या भाषणावेळी म्हणाले, माझ्यासमोर युगपुरूष छत्रपती



शिवाजी महाराजांची मूर्ती आहे. महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करताना जाती-पाती आणि नात्यागोत्याचा विचार केला नव्हता. त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. राजांनी सर्व मावळ्यांना एकवटलं आणि त्यातून इतिहास निर्माण केला. हा इतिहास आपल्या सर्वांना माहिती आहे. महाराजांचा हा इतिहास ऐकल्यावर आजही आपली छाती फुगते. असाच काही इतिहास लोकांना माहिती नाहीये.

अजित पवार म्हणाले, मी विकासाच्या मागे जाणारा कार्यकर्ता असल्यामुळे काही निर्णय घेतले. मी अनेकदा आमच्या सहकाऱ्यांना सांगितलं, काही वेळा आमच्या वडिलधाऱ्यांनाही (शरद पवारांना) सांगितलं होतं. अनेकांना माहिती नसेल की, २०१४ मध्ये आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विधानसभा निवडणुकीचा संपूर्ण निकाल यायच्या आधीच भारतीय जनता पार्टीला विधानसभेत बाहेरून पाठिंबा दिला होता. त्यानंतर आपले देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री झाले होते. त्यानंतर आम्हाला सांगण्यात आले की काही दिवसांनी आपल्याला त्या सरकारमध्ये जायचे आहे. परंतु, कुठे काय खटकले माहिती नाही. तेव्हा वरून केवळ आदेश यायचे आणि आम्ही फक्त त्या आदेशांची अंमलबजावणी करायचो.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, एक हाडाचा कार्यकर्ता म्हणून मी महाराष्ट्रभर फिरतो. मला पहाटे पाच वाजता उठून सहा वाजता कामाला लागायची सवय आहे. मी अक्षरश: माझ्या मतदारसंघात ६ वाजल्यापासून कामाला सुरुवात करतो. तेच सातत्य मी आजपर्यंत टिकवलं आहे.

# नीरा-देवघर धरण परिसरात कलम १४४ लागू...

## धरणग्रस्तांचा आवाज थोपविण्यासाठी सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न



**भोर/प्रतिनिधी**

राज्यात सगळीकडे कडक उन्हाळा सुरू झाला असून पुणे जिल्ह्यातील काही तालुक्यात दुष्काळाच्या झळा जाणवत आहेत. त्यातच भोर तालुक्यात दोन धरणे आहेत मात्र तालुक्यातील कडक उन्हाळा व धरणातून होत असलेला पाण्याचा विसर्गामुळे नीरा देवघर व भाटघर धरणाची पाणी पातळी कमी झाली असून काही गावात टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे.निरा देवघर धरणातील पाणी पातळी जस जशी कमी होत आहे तस तसा परिसरातील गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या विहीरीची पाणी पातळी खोल जात आहे परिणामी पाणी टंचाईच्या समस्येस समोरे जावे लागणार असल्यामुळे चिंतातुर धरणग्रस्त संघटनेने रविवार (दि. २१) रोजी धरणावर जाऊन रात्रीत अधिकाऱ्यांना घेराव्यात घेऊन जलसमाधीचा पावित्रा घेत पाण्याचा विसर्ग बंद केला. मात्र सत्ताधाऱ्यांनी धरणग्रस्तांनी एकजूट लक्षात घेऊन त्यांना चाप बसावा म्हणून सोमवार (दि.२२) रोजी तात्काळ निरा देवघर धरण २०० मीटर परिसरात १४४ कलम लागू करण्याचा आदेश पारित केला आहे.

नीरा देवघर धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने उपलब्ध पाणी साठ्यात झपाट्याने घट होत असून निरा देवघर धरण भागातील गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीतील पाणी पातळी कमी झाल्याने पाणी टंचाईच्या समस्येला समोरे जावे लागणार असल्याने धरणातून सुरु असलेला विसर्ग बंद करावा यासाठी हिरडस मावळा तील धरणग्रस्त शेतकरी, ग्रामस्थ आक्रमक होत शनिवार (दि.२०) धरणावर जाऊन अधिकाऱ्यांना पाणी बंद करण्यास भाग पाडले होते.मात्र हे आंदोलक निघून गेल्यावर त्याच रात्री अंदाजे एकच्या सुमारास प्रशासनाकडून पाण्याचा विसर्ग सुरू केल्याने भागातील ग्रामस्थ आक्रमक होत पाणी सोडल्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी व पुन्हा पाणी बंद करण्या च्या मागणीसाठी धरणावर रविवार (दि.२१) संध्याका ळी सहाच्या सुमारास जमले. परंतु धरणग्रस्त गावां तील नागरीकांनी (दि.२१) रोजी निरा देवघर धरणात जलसमाधी आंदोलन घेत असल्याचे लेखी निवेदन संबंधित विभागांना दिले असल्याचे आंदोलकांनी सांगितले.

निवेदनानुसार जलसंपदा विभागाचे शाखा अभियंता व उपकार्यकारी अभियंता दुपारी तीनच्या सुमारास निगुडघर या ठिकाणी उपस्थित राहिले, मात्र त्यांच्यामध्ये व प्रकल्पबाधितांमध्ये झालेल्या चर्चेत निरा देवघर धरणामधून सुरु असलेले संपूर्ण आवर्तन आम्हाला बंद करता येणार नाही. याचा निर्णय वरिष्ठ अधिकारी घेतील असे सांगण्यात आले. त्यानंतर प्रकल्पबाधितांनी अधिकारी व प्रशासना विरोधात घोषणा देत पाणी बंद करण्याच्या भुमिकेवर आक्रमक पवित्रा घेतला. यावेळी प्रकल्पबाधित आक्रमकता व जलसमाधी घेण्याच्या पवित्र्यात असल्याने निरा पाटबंधारे उपविभाग सहायक अभियंता योगेश भंडलकर यांनी सदर सुरु असलेला पाणी पुरवठा बंद केला; परंतु पाणी बंद करुन प्रशासन पुन्हा रात्रीत पाणी सुरु करतील म्हणून कार्यकारी अभियंता दिगबंर डुबल यांनी धरणावर येऊन पाणी सोडणार नसल्याचे लेखी द्यावे अन्यथा तो पर्यंत आम्ही धरणावरुन जाणार नाही असा पवित्रा नागरिकांनी घेतला असल्याने रात्री आठ वाजता अधिकारी आले तोपर्यंत भोर पोलिस प्रशासन व तहसिल विभागाकडून शांतता राखण्याचा प्रयत्न केला. अधिकारी डुबल व आंदोलक यांच्यात दिड तास चर्चा झाली.या चर्चे नंतर आंदोलक पाणी बंद करण्याच्या भुमीकेवर ठाम होते. तसेच अधिकाऱ्यांनी लेखी द्यावे या विषयावर ठाम होते. यावेळी आंदोलक व अधिकारी यांच्यात शाब्दिक वाद पाहायला मिळाले. शेवटी लोकांची आक्रमता पाहून डुबल यांनी लेखी दिल्यावर आंदोलक शांत झाले.

> **"धरणग्रस्त आणि स्थानिकांसाठी दीड टीएमसी पाणीसाठा ठेवलेला असून कालवा समितीच्या ठरवा नुसार पाण्याचा विसर्ग सुरू आहे. धरणातील जेवढे उपलब्ध पाणी साठे आहेत. त्यांचे सिंचनासाठी, पिण्यासाठी किती असे नियोजन केलेले असते. त्याची अंमलबजावणी करण्याचे काम प्रशासन म्हणून आमचे असते.**
>
> **- दिगंबर डुबल**
> **पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता, पुणे**

कालवा सल्लागार समितीच्या २४ फेब्रुवारी रोजी ठरल्याप्रमाणे निरा देवघर धरणाच्या पाण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार निरा देवघर धरण प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या आंदोलन अनुसरून पुढील चर्चा होईपर्यंत आय सी पी ओ गेट द्वारे जास्तीचा विसर्ग सोडण्यात येणार नाही. सदर चर्चा वरीष्ठ अधिकाशी (पाटबंधारे खाते) व स्थानिक लोकप्रतिनीधी आमदार यांच्या सोबत होईल असे लेखी पुणे पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल यांनी दिल्यानंतर आंदोलन शांत झाले.

निरा देवघर धरणातील पाणी पातळी कमी झाली असल्या कारणामुळे धरणग्रस्त भागातील नागरिकांनी धरणावर जाऊन अधिकाऱ्यांना पाण्याचा विसर्ग बंद करण्यासाठी भाग पाडले असताना धरणावर पाणी साठ्याचा प्रश्न पेटला असताना धरणग्रास्थांची एकजूट लक्षात घेऊन त्यांचा आवाज थोपविण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी धरण परिसरात २०० मीटरच्या परिसरात १४४ कलम लागू करण्याचा आदेश पारित केला असुन आगामी लोकसभा निवडणूकीमध्ये अन्यायाला वाचा फोडण्यासाठी धरणग्रस्तांनी पुकारलेले आंदोलना चाप बसावा म्हणून सत्ताधारी सरकारने धरण परिसरात १४४ कलम लागू केले असल्याचे जनसामान्यातबोलले जात आहे.

# विद्यार्थिनींनी सादर केलेल्या पथनाट्याने भीमनगरला मतदार जनजागृती!

**राजदंड / कोरेगाव**

पन्नास टक्के पेक्षा कमी मतदान असणाऱ्या केंद्रांवर विशेष मतदार जनजागृती मोहिम जिल्ह्यात राबवली जात आहे. त्या अंतर्गत कोरेगाव तालुक्यातील भीमनगर येथे मतदान जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात घेण्यात आला. नागरिकांचा आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग हे याचे वैशिष्ट्य ठरले!

यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी मनीषा चंदुरे, केंद्रप्रमुख सर्जेराव धनावडे, जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा शिपटे, सातारा रोड येथील चंद्रकांत वसंतदादा पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक संग्राम फाळके इत्यादी मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

सातारा रोडच्या विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींनी मतदान जनजागृतीसाठी प्रभावी पथनाट्य सादर केले. मतदानाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या पथनाट्यातून उपस्थित नागरिकांचे प्रबोधन झाले.

यावेळी सातारा रोडचे शिक्षक सुनील जाधव यांनी मतदानाची प्रतिज्ञा सर्व उपस्थितांना दिली. भीमनगर येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती करणारी घोषवाक्य असणारी प्रभावी पोस्टर्स सादर केली. त्याची विशेष कौतुक झाले.

यावेळी विस्तार अधिकारी श्रीमती चंदूरे म्हणाल्या,'' मतदानाचा टक्का वाढविणे गरजेचे आहे. लोकशाही प्रक्रियेमध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे. मतदानाबाबत उदासीनता दाखवू नये. देशाचा विकास, समृद्धी आणि संपन्नता यासाठी १०० टक्के मतदान गरजेचे आहे. हेच आपले महत्त्वाचे ध्येय आहे. सर्वांनी मतदान करावे, त्यासोबत इतरांनाही मतदानासाठी उद्युक्त करावे. विद्यार्थ्यांनी सर्वांना मतदानाचे महत्त्व पटवून द्यावे. मतदान करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. आपल्या राज्यघटनेने आपल्याला मतांचा अधिकार दिला आहे. तो अधिकार वापरून देशाच्या विकास प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी व्हावे, असे त्यांनी सांगितले.

# राजगुरूनगर येथील दुर्गवेड्या आरुडे कुटुंबाचा अनोखा विक्रम

## २४० फूट नवरा सुळका सर केल्याने 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये झाली नोंद !

**राजगुरूनगर (वा.)** : राजगुरूनगर (ता. खेड) येथील गिर्यारोहक अजित आरुडे (वय-४४) आणि सुनिता आरुडे (वय-३८) या दाम्पत्याने एक आगळा वेगळा छंद जोपासत, अभिनव आरुडे (वय-१५) अद्वय आरुडे (वय-८) या आपल्या मुलांसमवेत, नाशिक-त्र्यंबकेश्वर जवळील, पहिने या गावातील ९० अंश कोनातील २४० फूट उंच 'नवरा' सुळका सर करीत अनोखा विक्रम केला आहे. त्यांच्या या कामगिरी ची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये घेतली असून, अशाप्रकारे सर्व कुटुंबाने एकाच वेळी असे रेकॉर्ड बनवणे ही देशातील पहिलीच घटना आहे.




खेड तालुक्यातील तिन्हेवाडी (राजगुरूनगर) येथील अजित आरुडे हे खाजगी कंपनीत नोकरी करतात ,तर सुनिता आरुडे या आंबोली या ठिकाणी प्राथमिक शिक्षिका आहेत. या कुटुंबाने यापूर्वी कळसुबाई, लिंगाणा ,अलंग - मदन - कुलंग, वजीर सुळका, वानरलिंगी सुळका, कलावंतीण दुर्ग, मलंगगड असे विविध अवघड दुर्गांचे ट्रेक पूर्ण केले आहेत. आपल्या मुलांमध्ये तसेच समाजामध्ये आपल्या ऐतिहासिक समृद्ध वारशाचे व पर्यावरण संरक्षणाचे संस्कार व्हावेत यासाठी दर रविवारी हे कुटुंब मुलांसमवेत गड किल्ले भटकंती, प्लास्टिक मुक्त गडकिल्ले, अशा विविध मोहिमेत सहभाग घेतात.

प्रभू श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठापणा दिनाच्या निमित्ताने टीम फोर्ट ॲडव्हेंचर व एम एम आर आयोजित ,सहयाद्री खोऱ्यातील अतिशय कठीण मानल्या जाणाऱ्या नवरा सुळका आरोहण मोहिमेत, या संपूर्ण कुटुंबाने सहभाग घेतला. प्रचंड वारा, आगी मोहोळ च्या माशा, कठीण कातळ कडा, अशा संकटांना सामोरे जात, सकाळी ७ ते संध्याकाळी ५ या कालावधीत हा सुळका सर करून २४० फूट सुळक्यावरून रामलल्लाना अभिवादन केले. योगायोग असा की, श्रीराम नवमी च्या दिवशीच या विक्रमाची नोंद या कुटुंबाच्या नावावर झाली. त्यांना प्रमाणपत्र व पदक देऊन नुकतेच गौरविण्यात आले. सर्वच स्तरातून त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

यापुढील काळात महाराष्ट्रातील सर्व गड किल्ल्यांना भेटी देणे व जगातील सर्वांत उंच शिखर माउंट एव्हरेस्ट सर करण्याचा त्यांचा मानस असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

# भगवान महावीर जयंतीनिमित्त जैन श्रावक संघातर्फे शोभायात्रा, शरबत वाटप



**हडपसर : प्रतिनिधी**

भगवान महावीर जयंती निमित्त चंदन नगर येथे श्री वर्धमान स्थानिकवासी जैन श्रावक संघातर्फे भव्य मिरवणूक (शोभायात्रा) काढण्यात आली होती. यावेळी भगवान महावीर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मिरवणुकीमध्ये सहभागी झालेले जैन बांधवांना व स्थानिक नागरिकांना शरबत वाटप, ताक वाटप, पाणी बॉटल वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व्यापारी व उद्योग सेलचे पुणे शहर उपाध्यक्ष अभिजीत शहा यांनी केले.

यावेळी श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष नेमीचद कर्नावट, उपाध्यक्ष हेमंत नहार, परेश कटारिया, धीरज चोपडा, सुनील चोरडिया, हर्षद लूनिया, पार्श्व शहा, सुजल शहा, संतोष सिंघवी, अनिल कांकरिया आदी उपस्थित होते.

### केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत

# सारथी संस्थेच्या २० विद्यार्थ्यांचे यश

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे** : नुकत्याच जाहीर झालेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) नागरी सेवा स्पर्धा परीक्षा २०२३ च्या अंतिम निकालात छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) २० विद्यार्थ्यांची अंतिम गुणवत्ता यादीत निवड झाली आहे, अशी माहिती सारथीचे उपव्यवस्थापकीय संचालक अनिल पवार यांनी दिली आहे.

निवड यादीमध्ये पुणे जिल्ह्यातून ६, नाशिक जिल्ह्यातून ५, अहमदनगर जिल्ह्यातून २ तसेच कोल्हापूर बुलढाणा, जळगाव, अकोला, वाशिम, हिंगोली व सातारा जिल्ह्यातील प्रत्येकी एक विद्यार्थी अशा एकूण २० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यामध्ये ४ विद्यार्थिनींचा समावेश आहे.

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी ह्या लक्षित गटाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी काम करते. लक्षित गटातील होतकरु उमेदवारांना स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळून विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरीता संस्था प्रयत्न करते. युपीएससी परीक्षेच्या तयारीकरिता विद्यावेतन देवून नवी दिल्ली व पुणे येथील नामांकित प्रशिक्षण संस्थेत निःशुल्क प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येते.

मागील तीन वर्षात सारथी संस्थेमार्फत ५८ विद्यार्थी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा स्पर्धा परीक्षेत यशस्वी झाले होते. यावर्षी प्रशिक्षण देण्यात आलेल्या ४५ विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थी यशस्वी झाले असून आतापर्यंत सारथी संस्थेमार्फत एकूण ७८ विद्यार्थी युपीएससी परीक्षेत यशस्वी झाले आहेत.

सारथी संस्थेचे अध्यक्ष अजित निंबाळकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांनी उत्तम प्रशासन करून या देशाच्या विकासात महाराष्ट्राचा ठसा उमटावा, अशा शुभेच्छा व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांनी दिल्या आहेत.

# वडूजमध्ये उरूसानिमित्त काढलेल्या झेंड्याच्या मिरवणुकीत वाजली 'तुतारी'!



**राजदंड / वडूज**

दरवर्षी प्रमाणे यावर्षी ही वडूजमधील हजरत सिध्दीलाल शाह बाबा यांचा उरूस दि, २० एप्रिल रोजी मोठ्या थाटात साजरा करण्यात आला,

कोरोना काळानंतर सुमारे ४ वर्षांनी वडूज मध्ये हजरत सिध्दीलाल शाह बाबा यांचा ऊर्स पार पडला, संध्याकाळी ६ वाजत झेंड्याच्या मिरवणूकिची सुरूवात माजी पंचायत समिती सदस्य नंदकुमार गोडसे भैय्या व वडूज मुस्लिम जमात चे जेष्ठ सदस्य यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आली, तर या मिरवणुकीत तुतारी वाजल्याचा आवाज ही ऐकू आला,

मिरवणूक वडूज मधील मुलानवाडा ह्या ठिकाणी आल्या नंतर सोलापूर जिल्हा परीषद चे माजी जिल्हा परीषद अध्यक्ष मदनदादा मोहिते पाटील, अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस चे सदस्य रणजीत सिंह देशमुख भैय्या, माजी आयुक्त प्रभाकर देशमुख, वडूज नगरपंचायतीचे माजी कार्यकारी नगरसेवक डॉ. प्रशांत गोडसे, कार्यकारी नगरसेवक संजय गोडसे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा युवक अध्यक्ष मकरंद बोडके, काँग्रेसचे राजूभाई मुलाणी आदी मान्यवरांनी झेंडा मिरवणुकीला भेट देऊन श्रीफळ वाढवून झेंडा दर्शन घेतलं. हजरत सिध्दीलाल शाह बाबा उरूस कमिटीतर्फे मान्यवरांचे श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.

झेंडा मिरवणुकीत सर्व जाती धर्मातील समाज बांधवांनी उपस्थित राहून झेंड्याचे दर्शन घेवून उरूसामध्ये उपस्थित राहून सहभाग घेतल्याने पुन्हा एकदा वडूजमध्ये हिन्दू-मुस्लिम ऐक्याचे प्रतिक घडून आलेले आहे. यावेळी उरूस कमिटीचे कार्याध्यक्ष इम्रान बागवान, अध्यक्ष- शकिल मुल्ला, उपाध्यक्ष- शिराजभाई शिकलगार, खजिनदार-इसाकभाई मुल्ला, सचिव-मुबारक शिकलगार तसेच संचालक, दाऊदभाई मुल्ला, अमिनभाई मुल्ला, बरकतभाई मुल्ला, समिरभाई अत्तार, बाकूभाई मुल्ला, महमंदभाई मुल्ला, आय्याजभाई मुल्ला, मन्सूर पिंजारी, जमीर शेख, अल्ताफ मुजावर, दिलावर मुल्ला, शाकिर शेख, निसार अत्तार, सद्दाम मुल्ला, सादीक मुल्ला, मन्सूर मुल्ला, इब्राहिम मनेर, इम्रान मुल्ला, जाकिर डांगे, सोहेल मुल्ला, निसार मुल्ला, टिपू मुल्ला, शेरखान डांगे, मुन्ना नजीर मुल्ला आणि ग्रीन टायगर ग्रुप वडूजचे सर्व सदस्य यांनी परिश्रम घेत उरूस पार पाडण्यासाठी खूप परिश्रम घेतले.

ज्येष्ठ संचालक कमुशेठ मुल्ला, सिकंदर मुल्ला, शरीफभाई अत्तार, नासीर डांगे, मौलाना नूरमहंमद हसनजान सय्यद यांच्या हस्ते दुवॉ पठण आदी सर्व विधी पार पडले, तर खोडशी येथील सुप्रसिध्द गंधर्व बँन्ड हे मिरवणुकीचे विशेष आकर्षण होतं.

# राष्ट्रपुरूषांचे विचार आत्मसात करणे आवश्यक : अनंत गुरव

**राजदंड / पाटण**

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा एकच विचार होता, तो म्हणजे प्रत्येक नागरिक उच्चशिक्षित झाला पाहिजे. या राष्ट्रपुरुषांचे विचार आत्मसात करत आपण रात्रं-दिवस शिकले पाहिजे तरच आपली व देशाची प्रगती होईल, असे प्रतिपादन पाटणचे तहसीलदार अनंत गुरव यांनी केले.



कोयना विभागातील मेंढेघर येथे छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी तलाठी बोबडे, लुगडे, सामाजिक कार्यकर्ते महेंद्र उर्फ आप्पासाहेब कदम, सुमन कदम, जनाबाई कदम, ज्येष्ठ पत्रकार विक्रांत कांबळे, गोपीनाथ कदम, अमोल कांबळे, संजय कदम, सतीश थोरवडे, विजय कदम, ज्येष्ठ कार्यकर्ते मधुकर थोरवडे, बबन कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अनंत गुरव म्हणाले, फक्त शिक्षण घेऊन चालत नाही तर उच्च शिक्षण घेणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्याकाळी शिक्षणाची साधने उपलब्ध नसतानाही विविध उपक्रम राबवले. त्यांचा वसा घेऊन छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले यांनी समाजासाठी शिक्षणाची कवाडे खुली केली. सर्व समाजाला शिक्षण घेता यावे म्हणून विविध सवलती दिल्या. महात्मा जोतिबा फुलेंनी सावित्रीबाई फुलेंना पहिली शिक्षिका केले. सावित्रीबाई फुले यांनी अनेक अडचणींवर मात करत, हालअपेष्टा सहन करत महिलांना शिक्षण दिले, म्हणूनच आज महिला उच्चपदावर विराजमान झाल्याचे आपण पाहत आहोत. त्यांचाच वसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे चालवला. ते स्वतः विश्वभूषण झाले म्हणूनच ते आपल्या देशाचे संविधान निर्माते झाले. त्यांचा वसा आपण पुढे चालवणे गरजेचे आहे. आजच्या पिढीने उच्चशिक्षित झालं पाहिजे. त्यामुळे आपले कुटुंब, आपलं गाव, आपले राज्य व आपला देश नक्कीच प्रगतिपथावर जाणार आहे. राष्ट्रपुरुषांची जयंती साजरी करताना त्यांचे आचारविचार आपण आत्मसात केले पाहिजेत, असे सांगून भविष्यात विविध परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचाही गुणगौरव येथे व्हावा, या कार्यक्रमासाठी आपण निश्चित हजर राहू, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रदीप कदम म्हणाले, पंचवीस वर्षांपासून येथे जयंती साजरी करत असताना छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार तळागाळात पोहोचवण्याचा प्रयत्न करतो आहे. पण विविध क्षेत्रात सामाजिक कार्य करणाऱ्या समाजासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचाही कौतुक करून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे आम्ही नेहमी उभे राहत असतो. भविष्यातही आपण सांगितल्याप्रमाणे विविध क्षेत्रात प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचाही सत्कार नक्कीच घेऊ असे, आश्वासन कदम यांनी दिले.

याप्रसंगी विविध क्षेत्रात मोठ्या हिरिरीने सामाजिक काम करणारे ज्येष्ठ पत्रकार विक्रांत कांबळे, बाळासाहेब कदम, नितीन चव्हाण, मुक्ता कोळेकर, संपत जाधव, श्रीपती माने आदी सामाजिक कार्यकर्त्यांचा तहसीलदार अनंत गुरव यांच्या हस्ते संविधानप्रत पुरस्कार देवून गौरवण्यात आले. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष नितीन थोरवडे यांनी स्वागत केले. सतीश थोरवडे यांनी सूत्रसंचालन केले. अमोल कांबळे यांनी आभार मानले. कार्यक्रमास परिसरातील नागरिक, महिला, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंडिया आघाडीचे शक्तीप्रदर्शन

## राहुल, लालूप्रसाद, अखिलेश यादव अन् सुनीता केजरीवाल एकत्र येणार



**झारखंड :** झारखंडची राजधानी रांचीमध्ये विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीची 'उलगुलान न्याय रॅली' आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी, राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष लालू प्रसाद यादव, नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांचा समावेश असलेल्या १४ राजकीय पक्षांचे नेते यात सहभागी होणार आहेत. या रॅलीचे नेतृत्व झारखंड मुक्ती मोर्चा करत आहे.

रांचीच्या प्रभात तारा मैदानावर होणाऱ्या या मेगा रॅलीत दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवालही उपस्थित राहणार आहेत. त्यांच्याशिवाय झारखंडचे माजी मुख्यमंत्री आणि झामुमो नेते हेमंत सोरेन यांच्या पत्नी कल्पना सोरेन याही उपस्थित राहणार आहेत. या रॅलीत केजरीवाल आणि सोरेन यांना अंमलबजावणी संचालनालयाने केलेल्या अटकेचा मुद्दा उपस्थित केला जाणार असल्याचे मानले जात आहे. ईडी सरकारसाठी काम करत असल्याचा आरोप विरोधकांनी यापूर्वीच केला आहे.

**झारखंडमध्ये विरोधक १४ जागा लढवणार**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचे मतदान होत असतानाच 'उलगुलान न्याय रॅली'चे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीद्वारे झारखंडमधील १४ जागांवर विरोधकही जनतेला आकर्षित करण्याचे काम करणार आहेत. रांची येथे होणाऱ्या या रॅलीआधीच, इंडिया अलायन्सने ३१ मार्च रोजी राजधानी दिल्लीतील रामलीला मैदानावर अशाच प्रकारची सभा संबोधित केली आहे. या रॅलींद्वारे विरोधकही सरकारविरोधात एकजूट दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत.

**रॅलीच्या माध्यमातून विरोधकांची योजना काय?**

झारखंडचे मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनी या रॅलीच्या माध्यमातून आदिवासी आणि आदिवासींवर सरकारकडून होत असलेल्या अत्याचारांचा पर्दाफाश केला जाईल, असे म्हटले आहे. आदिवासींना त्यांच्या जंगलातून आणि जमिनीतून हाकलून देण्याचे षडयंत्र कसे रचले जात आहे, हे जनतेला सांगितले जाईल. विरोधी पक्षांवर केंद्रीय तपास यंत्रणांनी केलेल्या कारवाईचा मुद्दाही उपस्थित केला जाईल, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री म्हणाले की, आगामी काळात जनता सरकारला उत्तर देणार आहे.


**अन्य कोणते नेते सामील होणार?**

काँग्रेसचे प्रमुख नेते मल्लिकार्जू खर्गे आणि राहुल यांच्याशिवाय पक्षाचे राज्यस्तरीय नेते यात सहभागी होणार आहेत. या रॅलीत झारखंडचे मुख्यमंत्री चंपाई सोरेन, कल्पना सोरेन, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार संजय सिंह, अखिलेश यादव, लालू यादव आदी नेते सहभागी होणार आहेत. या रॅलीत टीएमसीचे डेरेक ओब्रायन, शिवसेनेच्या (यूबीटी) प्रियांका चतुर्वेदी, सीपीआय (एमएल) मधील दिपंकर भट्टाचार्य यांच्यासह अनेक प्रमुख विरोधी नेते दिसणार आहेत.

# मुरादाबाद लोकसभा मतदारसंघातील भाजपा उमेदवाराचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन?

## पहिल्या टप्प्यात केले होते मतदान

**लखनऊ :** भारतीय जनता पक्षाचे मुरादाबाद लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार कुंवर सर्वेश सिंह यांचं निधन झालंय. वयाच्या ७१ व्या वर्षी त्यांनी शनिवारी दिल्ली एम्समध्ये अखेरचा श्वास घेतला. कुंवर सर्वेश यांना भाजपाकडून तिकीट मिळालं, तेव्हापासून ते रुग्णालयात दाखल होते. ते कर्करोगानं त्रस्त होते. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात शुक्रवारी १९ एप्रिल रोजी या जागेवर मतदान झालंय. त्यांच्या निधनावर पंतप्रधान मोदींनी शोक व्यक्त करत त्यांच्या निधनानं पक्षाची कधीही भरुन न येणारी हानी झाल्याचं म्हटलंय.



शक्तिशाली नेत्यांपैकी एक : पहिल्या टप्प्यात मुरादाबादमध्ये सुमारे ६० टक्के मतदान झालं होतं. तर याच जागेवर २०१९ मध्ये ६५.३९ टक्के मतदान झालं होतं. सर्वेश सिंह यांच्या विरोधात समाजवादी पार्टीच्या रुची वीरा रिंगणात आहेत. व्यवसायानं व्यापारी असलेले कुंवर सर्वे श सिंह हे उत्तर प्रदेशातील शक्तिशाली नेत्यांपैकी एक मानले जायचे. २०१४ मध्ये सर्वेश सिंह मुरादाबादमधून खासदार झाले. खासदार होण्यापूर्वी ते ठाकूरद्वारा विधानसभा मतदारसंघातून ४ वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. २०१४ मध्ये कंठ विधानसभा मतदारसंघात लाऊडस्पीकरच्या वादामुळंही सर्वेश कुंवर सिंह चर्चेत आले होते.

कुंवर सर्वेश सिंह यांचा राजकीय प्रवास : कुंवर सर्वे श सिंह यांचा जन्म २२ डिसेंबर १९५१ रोजी झाला. सर्वेश सिंह यांनी १९९१ मध्ये पहिल्यांदा भाजपाच्या तिकीटावर ठाकूरद्वारातून विधानसभा निवडणूक लढवली होती. त्यानंतर सलग चार वेळा निवडणूक जिंकून ते विधानसभेत पोहोचले. १९९१ नंतर सर्वेश सिंह यांनी १९९३, १९९६ आणि २००२ मध्ये सलग निवडणुका जिंकल्या होत्या. मात्र, २००७ मध्ये त्यांना बसपाच्या उमेदवाराकडून पराभवाला सामोरं जावं लागलं होतं. भाजपा नेते सर्वे श सिंह यांचा मुलगा सुशांत सिंह हा बिजनौरच्या बदापूर विधानसभेतून भाजपाचा आमदार आहे.

मुरादाबादमधून भाजपाने चौथ्यांदा दिली होती उमेदवारी : भाजपाने चौथ्यांदा मुरादाबाद लोकसभा मतदारसंघातून सर्वे श सिंह यांना उमेदवारी दिली होती. २००९ मध्ये त्यांनी माजी क्रिकेटपटू अझरुद्दीन यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती, पण त्यांचा पराभव झाला होता. २०१९ ची लोकसभा निवडणूकही लढवली, मात्र त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले होते.

# पहिची ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान फ्रान्स दौऱ्यावर

**दिल्ली :** चीफ ऑफ डिफ ेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान फ्रान्सच्या दौऱ्यावर रवाना झाले आहेत. दोन्ही देशांमधील संरक्षण क्षेत्रातील मजबूत संबंधांना अधिक बळकट करणे हे या भेटीचे उद्दिष्ट आहे. दोन्ही देशातील संरक्षण क्षेत्रातील संबंधांमध्ये गेल्या काही वर्षात लक्षणीय गती प्राप्त झाली आहे.

जनरल अनिल चौहान आपल्या या दौऱ्यात फ्रान्सच्या वरिष्ठ नागरी आणि लष्करी नेतृत्वाशी संवाद साधणार आहेत. यामध्ये त्यांचे समकक्ष फ्रेंच चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (उएचअ), जनरल थिएरी बर्कहार्ड आयएचईडीएन (नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर हायर डिफेन्स स्टडीज) चे संचालक आणि आयुध विभागाचे महासंचालक यांचा समावेश आहे.

जनरल अनिल चौहान फ्रेंच स्पेस कमांड, लँड फोर्से स कमांडला भेट देतील आणि इकोल मिलिटेअर (स्कूल ऑफ मिलिटरी) येथे लष्कर आणि जॉइंट स्टाफ कोर्सच्या विद्यार्थी अधिकाऱ्यांना संबोधित करतील. ते सॅफ्रान ग्रुप, नेव्हल ग्रुप आणि दसॉ एव्हिएशनसह फ्रान्समधील काही प्रतिष्ठित संरक्षण उद्योगांना भेट देणार आहेत आणि त्यांच्याशी संवादही साधणार आहेत.

सीडीएस जनरल अनिल चौहान न्यू वे -चॅपेल मेम ोरियल आणि विलर्स-गुइस्लेन येथील भारतीय स्मारकाला भेट देऊन पहिल्या महायुद्धात सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शूर भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ पुष्पचक्र अर्पण करतील.

# 'सॉरी चुकून घटस्फोट झाला' कोर्टाच्या चुकीमुळे २१ मिनिटांत मोडला २१ वर्षांचा संसार

**नवी दिल्ली, :** लग्न, घटस्फोट यांविषयी अनेक निरनिराळ्या घटना समोर येत असतात. नवरा बायको छोट्या छोट्या गोष्टींवर झालेल्या वादातूनही आजकाल घटस्फोट घेत आहेत. अनेक विचित्र कारणांवरुन घटस्फोट झाल्याच्याही घटना आहेत. मात्र आता एक अशी घटना समोर आलीय जी ऐकून कोणीही हैराण होईल. कोर्टने चुकून एका कपलचा घटस्फोट केला. हे प्रकरण नेमकं काय आहे याविषयी जाणून घेऊया.

आयशा वरदागच्या लॉ फर्मच्या सॉलिसिटरच्या चुकीमुळे हे सर्व घडलं. चुक झाली मात्र पुढे न्यायाधिशांनी हा निर्णय मागे घेण्यास नकार दिला. हे प्रकरण सध्या सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे.

विल्यम्स नावाच्या एका कपलच्या लग्नाला २१ वर्ष झाले होते. पण २१ मिनिटांत त्यांचं लग्न तुटलं. न्यायालयानं चुकून त्यांचा घटस्फोट केला. या जोडप्याला घटस्फोट घ्यायचा होताच मात्र ते आर्थिक करारच्या प्रोसेसमध्ये होते. वरदागच्या लिपिकाने ड्रॉप डाऊन मेनूमधून मिस्टर अँड मिसेस विल्यम्सचं नाव निवडलं. यामुळे २१ मिनिटांत त्यांचे २१ वर्षांचे लग्न मोडले. ही माहिती न्यायाधिशांना दिली तेव्हा त्यांनी हा निर्णय मागे घेण्यास नकार दिला.

वरदग फर्मने याविषयी म्हटले, राज्याने कम्प्युटरशी संबंधित त्रुटींच्या आधारे लोकांनी घटस्फोट देऊ नये. ही घटना समोर येताच सोशल मीडियावर व्हायरल झाली. कधी काय चूक होईल हे सांगू शकत नाही.

# शर्टलेस होऊन आला आणि लिफ्टमध्ये महिलेसोबत केली जबरदस्ती

**नवी दिल्ली :** तंत्रज्ञानामुळे अनेक गोष्टी सोयीस्कर झाल्या आहेत. त्यामुळे लोकांचे कष्ट कमी झालेत. मात्र अनेकदा या फायद्याच्या गोष्टी तोट्याच्याही वाटतात. इमारती चढून जावू लागू नये म्हणून लिफ्टचा शोध लागला मात्र अनेकदा या लिफ्टमध्ये विचित्र घटनाही घडताना दिसतात. कधी लिफ्ट बंद पडते तर कधी चोर घुसतात तर काही वेळा फायदा उचलून महिलांना त्रासही दिला जातो. अशीच एक घटना सध्या सम ोर आलीय, ज्यामध्ये एका व्यक्तीनं लिफ्टचा फायदा घेत महिलेसोबत दुरव्यवहार करण्याचा प्रयत्न केला. या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओ समोर आलाय.

लिफ्टचा फायदा घेत एका व्यक्तीनं एका महिलेला लिफ्टमध्ये ओढलं आणि तिच्यासोबत अील गोष्टी करण्याचा प्रयत्न करु लागला. मात्र वेळीच गार्ड देवासारखा धावून आला आणि तिला या संकटातून वाचवलं. या घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर खळबळ माजवतोय.

समोर आलेल्या या व्हिडीओम ध्ये तुम्ही पाहू शकता, एक महिला लिफ्टमध्ये चढली होती तेवढ्यात एका व्यक्तीनं तिला पकडलं. शर्टलेस असलेल्या या व्यक्तीनं महिलेला वाईटरित्या पकडलं. तेवढ्यात गार्ड धावून आला आणि त्यानं महिलेला या परिस्थीतून वाचवलं. त्याने व्यक्तीला बेदम मारलं. मग महिला तेथून सुरक्षित बाहेर निघाली. महिलेवर जबरदस्ती करण्याच्या प्रयत्न करणाऱ्या या माणसाला गार्डने चांगलाच धडा शिकवला.

नावाच्या द अकाऊंटवर हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. १ मिनिट ९ सेकंदांचा हा व्हिडीओ इंटरनेटवर वाऱ्यासारखा पसरत आहे. व्हिडीओ व्हायरल होताच लोकांनी व्यक्तीच्या या घाणेरड्या कृतीवर संताप व्यक्त केला. लोकांनी कमेंटमध्ये अशा लोकांवर राग व्यक्त केला.

दरम्यान, व्हायरल झालेली ही घटना नेमक्या कोणत्या ठिकाणची आहे हे स्पष्ट झाले नाही. मात्र काहीच वेळात व्हिडीओने लोकांचे लक्ष वेधून घेतले.

# तिहार जेलमध्ये अरविंद केजरीवाल यांच्या हत्येचा कट

## पत्नीचा भाजपावर गंभीर आरोप

**दिल्ली :** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनिता केजरीवाल यांनी भाजपावर अनेक गंभीर आरोप केले आहेत. भाजपा तिहार जेलमध्येच अरविंद केजरीवाल यांची हत्या करण्याचा कट आखत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसंच अरविंद केजरीवाल यांना खाण्यात दिल्या जाणाऱ्या प्रत्येक पदार्थावर प्रशासन लक्ष ठेवत असल्याचंही त्यांनी म्हटले आहे.

''अरविंद केजरीवाल यांच्या अन्नात कॅमेरे बसवले आहेत. त्यांनी घेतलेल्या प्रत्येक घासावर लक्ष ठेवले जात आहे. हे फार लाजिरवाणं आहे. ते शुगर पेशंट असून गेल्या १२ वर्षापासून इंसुलिन घेत आहेत. पण जेलमध्ये त्यांना इंसुलिन नाकारली जात आहे. त्यांना दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांची हत्या करायची आहे,'' असा आरोप सुनिता केजरीवाल यांनी केला आहे. त्या इंडिया आघाडीच्या रॅलीत बोलत होत्या.

पुढे बोलताना सुनिता केजरीवाल यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना दोषी सिद्ध न करता तुरुंगात टाकल्याबद्दल विद्यमान सरकारला 'हुकूमशाही' म्हटलं. ''त्यांनी अरविंद केजरीवाल आणि हेमंत सोरेन यांना जेलमध्ये टाकलं आहे. त्यांना दोषी सिद्ध न करताच जेलमध्ये पाठवण्यात आलं आहे. ही हुकूमशाही आहे. माझ्या पतीचा काय दोष आहे? चांगला शिक्षण, आरोग्य सुविधा देणं ही चूक आहे का?,'' अशी विचारणा सुनिता केजरीवाल यांनी केली आहे.

अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीतील लोकांसाठी आपला जीव पणाला लावला आहे, असंही त्या म्हणाल्या. ''ते एक खखढरप आहेत. तो परदेशात जाऊ शकले असते, पण ते देशभक्तीला प्राधाय देताता.

# छत्तीसगडमध्ये सीआरपीएफ जवानांच्या बसचा भीषण अपघात

## १० गंभीर जखमी, तिघांची प्रकृती चिंताजनक

**छत्तीसगड :** छत्तीसगडमधील बस्तर येथे निवडणूक ड्युटीवरून परतणाऱ्या सीआरपीएफ जवानांच्या बसचा भीषण अपघात झालाय. दंतेवाडा-जगदलपूर मार्गावरील रायकोटजवळ समोरून येणाऱ्या एका लहान वाहनाला वाचवत असताना जवानांची बस नियंत्रणाबाहेर जाऊन रस्त्यावर उलटली असल्याची माहिती हाती आलीय. या बसमध्ये एकूण ४० जवान होते. त्यातील १० जवान गंभीर जखमी झाले आहेत. तर त्यापैकी ३ जवानांची प्रकृती चिंताजनक असल्याचेही बोलल्या जात आहे. अपघातात जखमी जवानांना जगदलपूर मेडिकल कॉलेजमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांचावर सध्या उपचार करण्यात येत आहे. छत्तीसगडमधील दंतेवाडा जिल्ह्यातील फरासपाल या नक्षलग्रस्त भागात निवडणूक ड्युटी करून सर्व सीआरपीएफ जवान जगदलपूरला परतत होते, त्यादरम्यान हा अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे.

**१० जवान गंभीर, तर तिघांची प्रकृती चिंताजनक**

हाती आलेल्या प्रथमिक माहितीनुसार, दंतेवाडा-जगदलपूर मार्गावरील रायकोटजवळ, समोरून येणाऱ्या एका लहान वाहनाला वाचवताना सैनिकांना घेऊन जाणाऱ्या बसवर नियंत्रण सुटले आणि ती रस्त्यावर उलटली.

या घटनेची माहिती मिळताच जवानांच्या मदतीसाठी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळ गाठले. त्यानंतर सीआरपीएफ कॅम्पचे अनेक जवानही घटनास्थळी पोहोचले. सर्वांनी मिळून बसच्या काचा फोडून बसमध्ये अडकलेल्या जखमी जवानांना बाहेर काढले. त्यानंतर रुग्णवाहिकेच्या मदतीने जखमी जवानांना टोकपाल आरोग्य केंद्रात नेण्यात आले. जखमी जवानांमध्ये ३ जवान गंभीर जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. सध्या सर्व जखमींवर उपचार सुरू आहेत.

बसवरील नियंत्रण सुटल्याने अपघात

बस्तर लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिलला पहिल्या टप्प्यातील मतदान पूर्ण झाले. या सीआरपीएफ जवानांना बस्तरच्या नक्षलग्रस्त भागात कर्तव्यावर ठेवण्यात आले होते.

निवडणूक संपल्यानंतर सीआरपीएफचे सर्व जवान बसने जगदलपूरला परतत होते. येथून ते २६ एप्रिल रोजी होणाऱ्या मतदानासाठी सुरक्षा पुरवण्यासाठी कांकेर लोकसभा मतदारसंघाकडे रवाना झाले. मात्र रविवारी सकाळी दंतेवाडा येथून सैनिकांना घेऊन जगदलपूरच्या दिशेने निघालेली बस रायकोटजवळ राष्ट्रीय महामार्ग-६३ वर अपघातग्रस्त झाली.

गडचिरोलीत पुन्हा नक्षल आणि जवानांमध्ये चकमक

गडचिरोली जिल्ह्यात परत एकदा नक्षली आणि जवानांमध्ये चकमक झाल्याची घटना घडली आहे. या चकम कीत एक नक्षलवादी ठार झाल्याचे वृत्तही हाती आले असून काही शस्त्रेही पोलिसांनी जप्त केला आहे.

प्राप्त माहितीनुसार भैरमगडच्या केशकुतुल भागात ही चकमक झाली आहे. पहिल्या टप्प्यात पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्याच दिवशी जवान पुन्हा नक्षल विरोधी अभियानाला सुरुवात केली आहे. बिजापूरचे एसपी जितेंद्र यादव यांनी चकमक अजून ही सुरू असल्याची माहिती दिली आहे. विशेष म्हणजे १६ एप्रिल रोजी कांकेर जिल्ह्यातील आपाटोला जंगल परिसरात झालेल्या चकमकीत २९ नक्षल्याना कंठस्नान घातल्यास पोलिसांना मोठं यश आले होते. त्यानंतरही पोलीस अधिक सक्रिय झाले असून या नक्षल्यांचा सोध घेणे सुरू आहे.

# लग्नाहून परतणाऱ्या वाहनाला भरधाव ट्रकची धडक, ९ जण ठार'

## वऱ्हाडावर काळाचा घाला

**झालावाड (राजस्थान) :'** राजस्थानातील झालावाड जिल्ह्यातील अकलेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत भीषण अपघात घडलाय. भरधाव वेगात आलेल्या एका अनियंत्रित ट्रकनं कारला धडक दिली. या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाल्याची बातमी समोर येत आहे. आज पहाटे हा अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, हे सर्व लोक एका कारमधून मध्य प्रदेशातून दुगरगाव येथून आपल्या घरी परतत होते. दरम्यान, पाचोऱ्याजवळ एका अनियंत्रित ट्रकनं या कारला धडक दिली. या अपघातामुळं झालावाड जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जातेय.

अपघातात ९ जणांचा मृत्यू : अकलेरा पोलीस ठाण्याचे प्रभारी संदीप बिश्नोई यांनी सांगितलं की, अकलेराजवळील डुंगर गावातील नागरिक शनिवारी मध्य प्रदेशात त्यांच्या नातेवाईकांच्या लग्न समारंभासाठी गेले होते. दरम्यान, लग्नाच्या मिरवणुकीतून निघाले असताना त्यांच्या कारला भरधाव वेगानं येणाऱ्या ट्रकनं धडक दिली. या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाल्याचं त्यांनी सांगितलं.

तसंच एक जण जखमी असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत. सध्या पोलिसांनी मृतांचे मृतदेह अकलेरा येथील सार्वजनिक आरोग्य केंद्रात ठेवले आहेत.

**परिसरातील दुसरा मोठा अपघात :** अपघातात ठार झालेले नागरिक एकाच कुटुंबातील असल्याचे पोलीस ठाण्याच्या प्रभारींनी सांगितले. सध्या पोलीस अपघाताचे कारण शोधण्याचा प्रयत्न करत आहेत.

त्यांनी सांगितले की, अपघाताची माहिती कुटुंबीयांना देण्यात आलीय. कुटुंबीयांच्या तक्रारीनंतरच पुढील कारवाई केली जाईल. गेल्या काही दिवसातील हा दुसरा मोठा अपघात आहे. याआधीही पाच जणांचा डंपरने चिरडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना गंगाधर पोलीस ठाण्याच्या परिसरात उघडकीस आली होती.

# फय्याजच्या वडिलांनी नेहाच्या कुटुंबाची मागितली माफी, म्हणाले, कठोर शिक्षा करा

**हुबळी :** कॉलेजमध्येच काँग्रेस नगरसेवकाची २३ वर्षीय मुलगी नेहा हिरेमठ हिती तिच्याच क्लासमधील फय्याज नावाच्या तरुणाने हत्या केली. आता फय्याजच्या वडिलांनी नेहाच्या कुटुंबियांची माफी मागितली आहे. तसंच मुलाला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केलीय. फय्याजचे वडील बाबासाहेब सुबानी हे शाळेत शिक्षक आहेत. त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, गुरुवारी सायंकाळी सहा वाजता मला घटनेबद्दल समजले. मुलाच्या या कृतीने मी पूर्णपणे कोसळलो आहे.

फय्याजच्या वडिलांना पत्रकारांशी बोलताना अश्रू अनावर झाले होते. ते म्हणाले की, फय्याजला अशी शिक्षा द्या की पुन्हा असं धाडस कुणी करणार नाही. मी हात जोडून नेहाच्या कुटुंबियांची माफी मागतो. ती माझ्या मुलीसारखी होती. फय्याजच्या वडीलांनी सांगितले की मी आणि पत्नी सहा वर्षापासून वेगळे राहतो. मुलगा पत्नीसोबत रहायचा. त्याला पैशांची गरज असेल तेव्हा तो कॉल करायचा.

नेहाची हत्या करणाऱ्या फय्याजचे त्याच्या वडिलांसोबत शेवटचे बोलणे तीन महिन्यांपूर्वी झाले होते. फय्याजचे वडील म्हणाले की, जवळपास ८ महिन्यांपूर्वी नेहाने फोन करून फय्याज त्रास देत असल्याचे सांगितले. मुलाची चूक स्वीकारत ते म्हणाले की फय्याज आणि नेहा एकमेकांवर प्रेम करत होते.

फय्याजने मला सांगितले होते की त्याला नेहाशी लग्न करायचेय. पण मी त्याला नकार दिला होता. मी कर्नाटकातील लोकांनी मला माफ करावे अशी विनंती करतो. माझ्या मुलाने चूक केलीय त्याला कायद्याने शिक्षा व्हावी. माझ्या मुलामुळे माझ्या शहरावर कलंक लागला. पण मला माफ करा असे फय्याजचे वडील म्हणाले.

नेहाच्या कुटुंबियांसह तिच्या मित्र परिवाराने आरोपीला फाशी द्यावी अशी मागणी केलीय. नेहाच्या कुटुंबियांकडून फय्याजसोबत तिचे प्रेमप्रकरण नव्हते असे स्पष्ट केले. नेहाने प्रपोज स्वीकारले नाही म्हणून तिची हत्या केल्याचा आरोप कुटुंबियांनी केलाय.

# बंअखेर ९ वर्षांनी समोर आला छोटा राजनचा फोटो, जिवंत आहे दाऊद इब्राहिमचा सर्वात मोठा शत्रू

**दिल्ली :** दिल्लीच्या तिहार जेलमध्ये कैद असलेला अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनचा नवा फोटो समोर आला आहे. भारतीय गुप्तचर यंत्रणांनी २०१५ मध्ये छोटा राजनला परदेशात पकडले होते. यानंतर प्रत्यार्पण करत त्याला भारतात आणण्यात आले होते. २०१५ नंतर समोर आलेला छोटा राजनचा हा पहिला फोटो आहे.

जो फोटो समोर आला आहे तो २०२० मधील आहे. त्यावेळी छोटा राजनचा करोनामुळे मृत्यू झाल्याचे दावे करण्यात आले होते. त्यानंतर हे फोटो समोर आले होते. छोटा राजनचे जे दोन फोटो समोर आले आहेत त्यातील एक फोटो एम्सम धील तर दुसरा रुग्णालयातील आहे. छोटा राजन सध्या दिल्लीच्या तिहार जेल क्रमांक २ मध्ये बंद आहे. येथे सुरक्षेचा कडक पहारा असतो. याच जेलमध्ये दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवालही बंद आहेत.

एक काळ असा होता जेव्हा छोटा राजन मोस्ट वाँटेड अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमचा निकटवर्तीय होता. त्याने तब्बल दोन दशकं पोलिसांना चकवा दिला होता. १९९३ च्या बॉम्बस्फोटानंतर छोटा राजन दाऊदपासून वेगळा झाला होता. छोटा राजन आणि दाऊद इब्राहिम यानंतर एकमेकांचे कट्टर शत्रू झाले होते. याच शत्रुत्वातून मुंबई, दुबई, नेपाळ येथे अनेकांच्या हत्या झाल्या. दाऊदचा खास माणूस असणारा छोटा शकील आजही छोटा राजनवर हल्ल्याच्या प्रयत्नात असतो.

छोटा शकीलने तर छोटा राजनला जाहीर धमकी दिली आहे. त्यात त्याने म्हटलं होतं की, ''आपण जोपर्यंत तिहार जेलमध्ये आहोत तोपर्यंत आपण सुरक्षित आहोत असं छोटा राजनला वाटत आहे.